
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३०५
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, २३ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

रोहा एमआयडीसीत ‘सीट्रिपलआयटी’ मंजूर/२
माथेरानचा १७५वा वाढदिवस साजरा/५
खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्र अव्वल स्थानावर/८

## पाकड्यांच्या संपर्कातील आणखी एका हेराला बेड्या



**वाराणसी :** उत्तर प्रदेश दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) वाराणसी जिल्ह्यातील दोशीपुरा येथून एका व्यक्तीला अटक केली आहे. तुफैल मकसूद आलम असे आरोपीचे नाव असून तो पाकिस्तान पुरस्कृत संघटनांच्या संपर्कात होता. या संघटनांना त्याने भारतातील काही ठिकाणांची माहिती दिली. इतकेच नाही, तर बंदी असलेल्या तहरीक–ए–लब्बॅक या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या मौलाना शाद रिझवी याचे व्हिडीओ तो भारतातील व्हॉट्सअॅपवर शेअर करत होता. तो तब्बल ६००पेक्षा जास्त पाकिस्तानी मोबाईलच्या संपर्कात होता. राष्ट्राच्या अखंडतेला आणि सुरक्षिततेला धोका निर्माण होईल अशा पद्धतीची माहिती पाकिस्तान आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटनांना पुरवल्याचा आरोप तुफैलवर आहे. एटीएसने तुफैलविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. त्याच्याकडून मोबाईल, सीमकार्ड जप्त करण्यात आले आहेत.

# महाराष्ट्रासह देशातील १०३ रेल्वेस्थानकांचे उद्घाटन

## माझ्या धमन्यांत रक्त नाही, तर गरम सिंदूर वाहतोय –पंतप्रधान मोदी

**बिकानेर : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानमधील बिकानेर येथे बोलताना पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादावर जोरदार टीका केली. माझ्या धमन्यांत रक्त नाही, तर गरम सिंदूर वाहत आहे. आता पाकिस्तानसोबत ना व्यापार होणार, ना चर्चा. प्रत्येक दहशतवादी हल्ल्याची किंमत त्याला चुकवावी लागेल, असा इशारा पंतप्रधान मोदींनी या वेळी दिला.

राजस्थानच्या बिकानेरमधील देशनोके येथे पंतप्रधान मोदींनी अमृत भारत रेल्वेस्थानक योजनेंतर्गत पुनर्विकास केलेल्या स्टेशनचे उद्घाटन केले. देशातील एकूण १०३ रेल्वेस्थानकांचे या वेळी दूरदृष्यप्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले.

पंतप्रधान मोदी आपल्या भाषणात म्हणाले, २२ तारखेच्या पहलगामवरील हल्ल्याच्या प्रत्युत्तरात आम्ही २२ मिनिटांत दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त केले. जेव्हा सिंदूर तोफगोळा होतो तेव्हा काय परिणाम साधतो हे आता जगाने आणि देशाच्या शत्रुनेही पाहिले आहे. एअर स्ट्राईकनंतर मी इथे आलो होतो तेव्हाच म्हणालो की, या मातीची शपथ देशाची मान मी झुकू देणार नाही. आज राजस्थानच्या भूमीमधून देशातील नागरिकांना नम्रपणे सांगू इच्छितो की, जे लोक कुंकू (सिंदूर) पुसायला निघाले होते. त्यांना आम्ही मातीत गाडले. जे भारताचे रक्त सांडत होते, त्यांच्याकडून रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा हिशेब घेतला आहे.

दरम्यान, अमृत भारत रेल्वेस्थानक योजनेंतर्गत महाराष्ट्रातील १०० स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम सुरू असून त्यापैकी १५ स्थानकांचे काम पूर्ण झाले आहे. त्यापैकी एक असलेल्या मुंबई परळ येथील स्थानकावरील कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली.



### स्टेशन्सचा होतोय पुनर्विकास

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या ११ वर्षांत देशात तब्बल ३४ हजार किमी नवीन रेल्वेमार्गांची उभारणी करण्यात आली आहे. यासोबतच अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत देशभरातील एक हजार रेल्वेस्थानकांचे आधुनिक पद्धतीने पुनर्विकास करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

## वैष्णवीच्या आरोपींना सोडणार नाही!

### उपमुख्यमंत्री अजित पवारांचा कस्पटे कुटुंबियांना धीर

**पुणे : प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांच्याशी फोनवरून संवाद साधून त्यांना धीर दिला तसेच आरोपींना सोडणार नाही, लवकरात लवकर सर्वांना अटक केली जाईल, असे आश्वासन दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, जी घटना घडली ती वाईट आहे. तुम्ही त्याचवेळी जर मला माहिती दिली असती, तर आपण वेळीच या प्रकरणात लक्ष घातले असते. दुसरी गोष्ट माझा या गोष्टीशी दुरान्वये संबंध नाही. वैष्णवीच्या मृत्यूची माहिती मिळाल्यानंतर मलाही दुःख झाले. पोलिसांना या प्रकरणी कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.




## जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांच्यात सामाजिक कार्याची अंगभूत जाणीव -लोकनेते रामशेठ ठाकूर

### जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे आणि युवा नेते प्रितम म्हात्रे हे समाजकार्यात अनेक दशके कार्यरत असून त्यांच्यात सामाजिक कार्याची जाणीव अंगभूत आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी (दि. २२) येथे केले.

पनवेल शहरातील गुरुशरणम सोसायटीमध्ये भारतीय जनता पक्ष श्री. प्रितम म्हात्रे जनसंपर्क कार्यालय उभारण्यात आले असून या कार्यालयाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.



या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ‘दिबा’साहेबांचे पुत्र अतुल पाटील, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस अॅड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, जीवन म्हात्रे, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, जगदीश पवार, माजी नगरसेवक बबन मुकादम, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, कर्नाळा मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, न्हावे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, रामेश्वर आंग्रे, बळीराम पाटील, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, प्रीती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, सारिका भगत, पुष्पलता मढवी, सीमा घरत, सरस्वती काथारा, लीना पाटील, रमाकांत म्हात्रे, गौरव कांडपिळे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (पान २ वर..)

## रायगडला आज रेड अलर्ट

**अलिबाग : प्रतिनिधी**

सतत चार दिवस रायगड जिल्ह्यात अवकाळी पाऊस पडत आहे. जिल्ह्यात शुक्रवारी (दि. २३) अतिवृष्टी होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे रेड अलर्ट देण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यात मागील चार दिवस अवकाळी पाऊस पडत आहे. गुरुवारीदेखील (दि. २२) पावसाने हजेरी लावली. गुरुवारी दिवसभर कडक ऊन पडले होते. दुपारनंतर पावसाला सुरुवात झाली. सायंकाळी पावसाचा जोर वाढला. पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले.

आणखी पुढील दोन दिवस पाऊस पडणार आहे. शुक्रवारी अतिवृष्टीची शक्यता आहे. हवामान विभागाने रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. त्यामुळे रायगड जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. मच्छिमारांनी मासेमारीसाठी खोल समुद्रात जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

सतत चार दिवस पडत असलेल्या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे. उकाड्यामुळे हैराण झालेल्या रायगडकरांना दिलासा मिळाला आहे. शेतकरी मात्र या अवकाळी पावसामुळे हैराण झाले आहेत तसेच लग्नसराईत पावसाने विघ्न आणल्याचे चित्र आहे.

## आंचल दलाल रायगडच्या नव्या पोलीस अधीक्षक

**अलिबाग :** रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची अहिल्यानगर येथे बदली झाली. त्यांच्या जागी आंचल दलाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



आंचल दलाल या राज्य राखीव पोलीस दल पुणे येथे समादेशक म्हणून कार्यरत होत्या. त्या २०१८ बॅचच्या आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी सातारा अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून काम केले आहे. रायगड पोलीस दलाचे नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी असतील.

## अवकाळी पावसामुळे मे महिन्यातच रानभाज्या बाजारात

**पनवेल : वार्ताहर**

वातावरण बदलामुळे या वर्षी रानभाज्या हंगामाआधीच उगवल्या आहेत. दरवर्षी मृगाच्या पावसामध्ये उगवणाऱ्या रानभाज्या यंदा अवकाळी पावसामुळे लवकर उगवल्या असून त्या विक्रीसाठी बाजारात येऊ लागल्या आहेत.

पावसाळ्यात नैसर्गिकरित्या उगविणाऱ्या विविध रानभाज्या ग्रामीण भागात उगवलेल्या आढळून येतात. या भाज्या चवीला रूचकर असतात तसेच त्या पौष्टिक आणि औषधीसुद्धा असतात. यामध्ये शेवळाच्या भाजीला विशेष मागणी असते. ही भाजी यंदा हंगामापूर्वीच उगवली आहे.



अवकाळी पावसामुळे शेवळासह इतर काही रानभाज्या मे महिन्यातच बाजारात विक्रीसाठी आल्या आहेत. खवय्ये या भाज्यांचा आहारात आवर्जून समावेश करीत आहेत. त्यामुळे आदिवासी समाजाला रोजगार मिळत आहे.



# रोहा एमआयडीसीत ‘सीट्रिपलआयटी’

## टाटा टेक्नॉलॉजी कंपनीकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केंद्र मंजुरीचे पत्र



**मुंबई : बीड, नांदेड,** छत्रपती संभाजीनगरनंतर आता रायगड जिल्ह्यासाठी १०५ कोटी खर्चाचे ‘सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अ‍ॅन्ड ट्रेनिंग’ अर्थात ‘सीट्रिपलआयटी’ मंजूर झाले आहेत. ‘टाटा टेक्नॉलॉजी’ कंपनीने केंद्र मंजुरीचे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले असून टाटा आणि राज्य शासनाच्या सहकार्यातून रोहा एमआयडीसी क्षेत्रात हे नवीन केंद्र उभे राहणार आहे. यामुळे रायगड जिल्ह्यातील युवकांना उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक ‘एआय’ तंत्रज्ञानासह रोजगाराभिमुख कौशल्यविकासाचे प्रशिक्षण मिळणार आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे यांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

रायगड जिल्ह्याच्या रोहा एमआयडीसीमध्ये होणाऱ्या या ‘सीट्रिपलआयटी’ केंद्राच्या एकूण १०५ कोटींच्या खर्चापैकी ८९ कोटी रुपये टाटा कंपनीतर्फे तर १६ कोटी रुपये राज्य शासन व जिल्हा प्रशासनातर्फे उपलब्ध करण्यात येणार आहेत. उपमुख्यमंत्री पवार यांच्या पाठपुराव्यामुळे गेल्या चार महिन्यात राज्यात मंजूरी मिळालेले हे चौथे केंद्र आहे. उपमुख्यमंत्री पवार यांच्या पत्रानंतर ‘टाटा टेक्नॉलॉजी’ कंपनीने अवघ्या दोन आठवड्यात बीड जिल्ह्यातील केंद्रास, दीड महिन्यात नांदेड आणि नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरच्या दोन केंद्रांना तसेच चार महिन्यात रायगड जिल्ह्यातील रोह्याच्या या ‘सीट्रीपलआयटी’ केंद्रास मंजूरी दिली आहे.

‘सीट्रीपलआयटी’ केंद्रांमुळे चारही जिल्ह्यांमधील युवकांना रोजगाराभिमुख अत्याधुनिक कौशल्यविकासाचे प्रशिक्षण मिळण्याचा तसेच जिल्ह्यांमध्ये उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

रायगडच्या रोहा एमआयडीसीत उभारण्यात येणाऱ्या या ‘सीट्रीपलआयटी’ केंद्रामुळे जिल्ह्यातील, कोकणातील युवकांना ‘एआय’ वापरासह जागतिक दर्जाचे आधुनिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी मिळणार आहे. उद्योगक्षेत्राला स्थानिक पातळीवर कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. कोकणातील नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासह अनेक उद्दीष्टांची पूर्तता या ‘सीट्रीपलआयटी’ केंद्रामुळे होणार आहे.

नव्या सेंटरमधून दरवर्षी ३ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून कोकणात उद्योगपूरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. ‘सीट्रिपलआयटी’च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षण खर्च ‘टाटा टेक्नॉलॉजी’ उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च ‘टाटा टेक्नॉलॉजी’ आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून करणार आहेत. यामुळे रायगडसह कोकणातील युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल.

त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपूरक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

# मान्सूनपूर्व पावसामुळे शेतकरी आणि व्यावसायिकांचे गणित कोलमडले



**महाड: प्रतिनिधी**

जून महिन्यात सुरू होणारा पावसाळा मे महिन्यातच कोसळू लागल्याने पावसाळ्याच्या तोंडावर असणारी सर्व कामे खोळंबली आहेत तर शेतकऱ्यांना पेरणीची चिंता लागली असून पावसाळा सुरू झाल्याने व्यावसायिकांची देखील गणित कोलमडले आहे.

दरवर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यानंतर पावसाला सुरुवात होते. मात्र यावर्षी मे महिन्यातच जुलै महिन्यासारखा पाऊस कोसळू लागला आहे. उन्हाळ्यातच पडणाऱ्या पावसामुळे बोडके डोंगर हिरवेगार झाले आहेत.

दर दिवशी सायंकाळी पाऊस कोसळत आहे. यामुळे मान्सूनपूर्व कामे खोळंबली आहेत. पेरणीची कामे करताना जमिनीला उष्म्याची गरज असते. मात्र यावर्षी सतत पाऊस पडत असल्याने जमीन देखील थंडावली असल्याने शेतकऱ्यांना पेरणीची चिंता लागून राहिली आहे. शेत जमिनीवर पावसाचे पाणी साचून राहत असल्याने नांगरणी सारखे कामे रखडली आहेत.

एकीकडे शेतकरी चिंतेत असताना दुसरीकडे मात्र लघु व्यावसायिक आणि व्यापारी देखील चिंतेत सापडला आहे. ऐन मे महिन्यात सातत्याने पाऊस कोसळत असल्याने सर्वात विक्रेते, आईस्क्रीम विक्रेते, त्याचप्रमाणे फळ विक्रेते देखील चिंतेत पडले आहेत. पावसाचे पाणी आंबा पिकावर पडत असल्याने मे महिन्यामध्ये आंबा खरेदीला मागणी असतानाच पावसामुळे आंबा विक्रीवर देखील पाणी फिरले आहे. मे महिन्यामध्ये येणारी करवंद, जांभूळ अशा फळ पिकांवर देखील परिणाम जाणवू लागला आहे. पावसाच्या पाण्याने जांभूळ, करवंद लवकर खराब होतात यामुळे त्याची मागणी मंदावली आहे. ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील शेतकरी पावसाळा सुरू होण्यापूर्वी कांदा खरेदीवर देखील भर देतो. मात्र यावर्षी कांदा विक्रीवर देखील परिणाम दिसून येत आहे.

मान्सून जून मध्ये दाखल होणार असला तरी मान्सूनपूर्व पावसामुळे शेतकऱ्यांसह शहरातील अनेक कामे रखडली आहेत. शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणे, सद्या सुरू असलेली विकास कामे, मुख्य रस्त्यांवरील रुंदीकरणाची कामे, आदी कामे आता पावसामुळे थंडावली आहेत. त्रास मात्र सर्वसामान्य माणसाला झाला आहे. ज्या अपेक्षेने व्यावसायिक मे महिन्याच्या अंतिम तारखेपर्यंत व्यवसाय करतात त्यांचे देखील गणित कोलमडले आहे.

# मांडवा-गेटवे प्रवासी जलवाहतूक वाहतूक बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

मांडवा अलिबाग ते गेटवे ऑफ इंडिया मुंबई ही प्रवासी जलवाहतूक रविवार पासून ( दि. २५ मे) बंद करण्यात येणार आहे. ३१ ऑगस्टपर्यंत ही वाहतूक बंद राहणार आहे, मात्र मांडवा ते भाऊचा धक्का दरम्यान चालणारी रो-रो सेवा सुरू राहणार आहे.

मुंबईतील गेट वे ऑफ इंडीया ते अलिबाग मधील मांडवा दरम्यान जलप्रवासी वाहतूक केली जाते. कोकण किनारपट्टीवर सर्वाधिक प्रवाश्यांची वर्दळ असणारा हा जलमार्ग म्हणून ओळखला जातो. दररोज साधारणपणे तीन हजार तर सुट्टीच्या दिवशी आठ ते दहा हजार प्रवासी या मार्गावरून प्रवास करत असतात. अलिबागहून दक्षिण मुंबईत अवघ्या दीड तासात पोहोचणे शक्य होते. प्रवासाचा वेळ वाचत असल्याने या जलप्रवासी वाहतूकीला प्रवासी आणि पर्यटकांची नेहमीच पसंती मिळत असते. सकाळी सहा वाजेपासून रात्री आठ वाजे पर्यंत या जलमार्गावरून पीएनपी, मालदार, अंजठा या खाजगी कंपन्यांच्या प्रवासी बोटी सुरू असतात.

पावसाळ्यातील चार महिने सोडले तर उर्वरित आठ महिने ही जलप्रवासी सेवा नियमित सुरू असते. पावसाळ्यात समुद्र खळवलेला असतो, त्यामुळे गेट वे ऑफ इंडीया जवळ बोटी लावणे अशक्य असते त्यामुळे प्रवाश्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही जलवाहतूक सेवा बंद ठेवली जाते.

यावेळी २५ मे पासून जलप्रवासी वाहतूक बंद करण्यात येणार आहे. मेरीटाईम बोर्डाने याबाबतचे आदेश जारी केले आहेत. कोकण किनारपट्टीवर सध्या वादळी वारे आणि मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे यंदा सहा दिवस आधीच जलप्रवासी वाहतूक बंद केली जाणार आहे. ही जलवाहतूक पुन्हा सप्टेंबर महिन्यापासून सुरू होणार आहे.

**भाऊचा धक्का ते मांडवा रो-रो सेवा सुरू राहणार**

दरम्यान गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान जलप्रवासी वाहतूक चार महिन्यांसाठी बंद होणार असली तरी भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान चालणारी रो रो सेवा मात्र नियमीत सुरू राहणार आहे. त्यामुळे प्रवाश्यांना आपल्या वाहनांसह अलिबागला पोहोचणे शक्य होणार आहे.

# नेरूळमधील करंदीकरांची पंतप्रधान सहाय्यता निधीला मदत

## दुःखातून निर्माण होणाऱ्या करूणेचे मूर्तीमंत उदाहरण!



**नवी मुंबई : बातमीदार**


नवी मुंबईतील नेरूळ मध्ये राहणारे सदानंद विष्णु करंदीकर ( ८२ वर्षे ) हे पत्नी सुमती यांच्यासह सेवा निवृत्त झाल्यानंतर अपत्य नसल्याने नेरुळमधील आनंद वृद्धाश्रमात राहायला गेले. मात्र, मागील वर्षी सुमती करंदीकर यांचे कर्करोगाने निधन झाले. यादरम्यान कर्करोगग्रस्तांच्या नातेवाईकांची धावपळ आणि पैशाअभावी होणारी धडपड करंदीकर यांनी जवळून पाहिली. त्यामुळे आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ त्यांनी कर्करोगग्रस्त रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी पंतप्रधान व मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी प्रत्येकी रुपये १० लाख, अशा एकूण २० लाखांच्या देणगीचा धनादेश दिला.

हा धनादेश करंदीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. एकीकडे दुःखातून वेदना आणि नैराश्याची भावना निर्माण होणारी असंख्य उदाहरणे असताना दुःखातून करुणेच्या निर्मितीचे हे मूर्तीमंत उदाहरण पाहायला मिळाल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्व असलेले सदानंद विष्णु करंदीकरजी यांचे हे मानवतेचा शिखरबिंदू ठरणारे कार्य आपल्या सर्वांसाठीच प्रेरणादायी राहील असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# पक्षी, किटकांकडून पावसाच्या आगमनाचे संकेत

**माथेरान : बातमीदार**





माथेरानमधील निसर्गातील विविध पक्षी,कीटक, प्राणी यांना पावसाच्या आगमनाची चाहूल लागली असून येथील बहुसंख्य पक्षांची घरटी बांधून पूर्ण झाली आहेत.मुंग्यांनी देखील आधीच रसद गोळा करून ठेवली आहे. वारुळाची म्हणजेच वाळवीची घरांची दुरुस्ती पूर्ण करून ठेवली आहे.

माथेरान हे एक पर्यटनस्थळ असून येथील असलेल्या जंगलामुळे, आल्हाददायक वातावरणामुळे आणि येथील जैवविविधतेमुळे प्रसिद्ध आहे. माथेरान मधील जंगलात असंख्य पशु, पक्षी, प्राणी, कीटक आहेत.या जैवविविधतेने समृद्ध असलेल्या माथेरान मध्ये निसर्गमित्र संस्था काम करीत असते. या संस्थेचे अध्यक्ष पवन गडवीर यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे येथील पशू-पक्ष्यांना पावसाच्या आगमनाची चाहूल लागली आहे.येथील जंगलात भटकंती करीत असतात अशा अनेक घटनांच्या नोंदी त्यांनी येथे केल्या आहेत.पक्ष्यांच्या विणीचा हंगाम सुरू झाला आहे, त्यामुळे पक्षांनी लवकर घरटी बांधून पूर्ण केली आहेत.बुलबुल, कोकिळा,टिटवी,कुकुटकुंभा,कावळा यांचे तर अंडी उबवण्याचे काम सुरू झाले आहे.तसेच काही पक्षांची पिल्ले घरट्यातून बाहेर देखील पडू लागली आहेत.

दोन दिवसांपूर्वी माथेरानच्या मुख्य बाजारपेठ येथील एका झाडावरून कोकिळेचे पिल्लू हवेत उडण्याचा प्रयत्न करताना सारखे रस्त्यावर पडत होते. हे दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांनी आणि नागरिकांनी गर्दी केली होती.तसेच मुंग्यांची सुद्धा खाणे साठविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून वाळवीची वारुळे देखील डागडुजी करून पूर्ण झाली आहेत.

चातक पक्षी ’पिऊ पिऊ’ असे ओरडू लागला की समजावे पहिल्या पावसाचे दिवस जवळ आले.कावळीणीने किती अंडी दिली आहेत यावरून सुद्धा पावसाचा अंदाज लावला जातो. चार अंडी दिली तर चांगला पाऊस, दोन अंडी दिली तर कमी पाऊस आणि एकच अंड दिलं तर अतिशय कमी पाऊस पडणार असे संकेत मिळतात.

पान १ वरुन

## जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांच्यात सामाजिक कार्याची अंगभूत जाणीव -लोकनेते रामशेठ ठाकूर

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जगात सर्वात चांगला नेता म्हणून नाव आहे, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचे सक्षमपणे नेतृत्व करीत असल्याचे सांगितले. प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष शेवटी स्वतः असे भाजपचे तत्व आहे. त्यामुळे देशप्रेम प्रथम अशी महत्त्वाची मूल्य असून भारतीय जनता पक्षात काम करेल त्याला संधी मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

१० मे रोजी प्रवेश झाला; आज २२ मे, पण तुम्ही थांबलात नाही. अवघ्या दहा-बारा दिवसांत तुम्ही भाजपची मूल्ये आत्मसात केली असे सांगतानाच प्रितम म्हात्रे धडाडीचा कार्यकर्ता आहे. त्यामुळे त्याला पुढे मोठी संधी आहे. पूर्वी शेकाप-भाजप म्हणून आमचे मतभेद झाले, पण जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे हे राजकारणविरहित काम करतात. त्यामुळे त्यांच्यासोबत कधीही दुजाभाव झाला नाही, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले. खुर्ची कामाकरिता असते, मानाकरिता नाही. या कार्यालयात मुख्य खुर्ची प्रितम म्हात्रे यांची असणार आहे, मात्र ते खुर्चीत न बसता उभे आहेत, असे सांगत त्यांनी कौतुक केले.

पनवेलमध्ये भाजपची तीन मुख्य कार्यालये झाली आहेत तसेच प्रत्येक नगरसेवकाचे व्यक्तिगत कार्यालय आहे. आता आणखी मोठे कार्यालय डेरवली येथे होत आहे. या कार्यालयातून लोकांची सेवा कायम झाली पाहिजे. त्यासाठी सर्वानी एकदिलाने काम करायचे आहे, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले. जो काम करेल तो पुढे जाईल. त्यामुळे आपले कुटुंब सांभाळत पक्षाचे आणि प्रामुख्याने देशहिताचे सर्वांनी काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या वेळी प्रितम म्हात्रे यांनी सर्वांचे स्वागत केले तसेच आपल्या भाषणातून पक्षाचे कार्य अधिक जोमाने करण्याचा मानस व्यक्त केला. आमदार विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचीही भाषणे झाली, तर प्रास्ताविक माजी नगरसेवक गणेश कडू यांनी केले.

या वेळी शेकापचे खांदा कॉलनी अध्यक्ष जयंत भगत, कामोठे शहर प्रमुख संघटक अल्पेश माने, व्यापारी संघटना अध्यक्ष सुरेश खरात, शुभांगी खरात, खांदा कॉलनी महिला अध्यक्ष निर्मला गुंडरे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.



## महावितरण भांडूप परिमंडळात मल्टी स्टेक होल्डर वर्कशॉप

**भांडूप,: प्रतिनिधी**

महावितरणच्या औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांसाठी तसेच महाराष्ट्रातील विविध वीज वितरण कंपनी व औद्योगिक संघटनांसाठी आरईसी तर्फे ‘मल्टी स्टेकहोल्डर वर्कशॉप’ आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेचा उद्देश जगभरातील १८० अर्थव्यवस्थांमधील व्यवसाय आणि गुंतवणूक वातावरणाचा सर्वेक्षण (बी-रेडी सर्वे) करणे आहे, ज्यामध्ये नियामक चौकट, संबंधित सार्वजनिक सेवांच्या तरतूदींवर लक्ष केंद्रित केले जाईल.

या कार्यक्रमासाठी सह संचालक ,महाराष्ट्र वीज नियामक आयोग ,हर्षद पाटील, कार्यकारी संचालक धर्मेंद्र नागपाल , महावितरण भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील, बेस्टचे उप मुख्य अभियंता मंगेश खरोटे , महावितरण ठाणे मंडळाचे अधीक्षक अभियंता युवराज मेश्राम , महावितरण वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता. दीपक पाटील, अडाणी पॉवर च्या श्रीमती प्राची बनसोडे व टाटा पॉवरचे तुषार शेठे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरईसी ‘मल्टी स्टेकहोल्डर वर्कशॉप’ बाबत माहिती दिली व ‘बी रेडी’ सर्वेक्षणाचे १० महत्वाचे मुद्दे व वीज यामध्ये कशी महत्त्वाची भूमिका बजावते यावर लक्ष केंद्रित केले. त्यानंतर, आरईसीचे अनुराग सिन्हा यांनी ‘बी रेडी’ सर्वेक्षणात मुल्यांकन करण्यासाठी ३ महत्वाचे स्तंभ १. वीज नियामक सुविधा २. वीज सेवांची गुणवत्ता व पारदर्शकता ३. प्रत्यक्षात वीज सेवा पुरवठ्याची कार्यक्षमता यावर सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर उपस्थित औद्योगिक व व्यावसायिक ग्राहक व औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींसाठी कार्यशाळेशी संबंधित प्रश्नोत्तरांचा सत्र ठेवण्यात आला होता.

आरईसी लि. भारतातील विविध राज्यांमध्ये अशा कार्यशाळा घेत आहे जेणेकरून या राज्यांना बी रेडी सर्वेक्षणाबद्दल जागरूकता येईल व सर्वेक्षणाच्या विविध पॅरामीटर्समध्ये सुधारणा करून भारताला या सर्वेक्षणात अग्रेसर स्थान घेता येईल.

## दुखवटा

### जयश्री खाडे

**माणगाव :** राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटना माणगावचे



अध्यक्ष राजेंद्र खाडे यांच्या मातोश्री कै. जयश्री दगडू खाडे यांचे गुरुवार दि. १५ मे रोजी सकाळी ९ वा. ठाणे येथील रुग्णालयात निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय -६२वर्षे होते. त्यांच्या पश्चात पती,दोन मुले,दोन मुली,सुना,जावई,नातवंडे असा परिवार आहे. दशक्रिया विधी शनिवार दि. २४ मे रोजी मु.ताकई फाटा,पुंडलिक मंदिर,अष्टविनायक महड गाव,रोड खोपोली ,ता.खालापूर येथे तर उत्तरकार्य विधी रविवार दि.२५ मे २०२५ रोजी मूळगावी राहते घरी भादाव येथे होणार आहे.

### विठ्ठल पाटील

**नवी मुंबई :** सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी नेरुळ गावातील ज्येष्ठ



नागरिक, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल गणू पाटील (वय ८३ ) यांचे गुरुवारी दुःखद निधन झाले. विठ्ठल गणू पाटील यांच्या पार्थिवावर नेरुळ गावातील स्मशान भूमीत गुरुवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, मुलगी, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

### अनंत मांजरेकर

**मोहोपाडा :** अनंत गणपत मांजरेकर यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८९ व्या



वर्षी निधन झाले. कै.हभप अनंत महाराज मांजरेकर दरवर्षी पंढरपूर वारी करायचे. त्यांच्या निधनाची वार्ता पसरताच वारकरी सांप्रदायासह मोहोपाडा रसायनी येथील नागरिक अंत्ययात्रेला उपस्थित राहीले.त्यांच्या पश्च्यात दोन मुळे,सुना,नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रीयाविधी गुरुवार दि.२९ में रोजी गुळसुंदे रसायनी येथील पाताळगंगा नदीवर होणार असून उत्तरकार्य रविवार दि.१ जून रोजी बांधनवाडी येथील राहत्या घरी होणार आहेत.

# पांडवकडा पर्यटनाला यंदाही प्रवेशबंदी!



**पनवेल : वार्ताहर**

पावसाळा सुरू होताच पर्यटक विविध पर्यटनस्थळांना भेटी देत असतात. या वेळी नवी मुंबईतील खारघर येथील विशेष ओळख असणाऱ्या पांडवकडा धबधब्यावर जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. पनवेलसह मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे इत्यादी शहरांपासून हाकेच्या अंतरावर असलेला हा धबधबा पाहण्यासाठी हजारो पर्यटक येथे येतात, मात्र यंदा पर्यटकांच्या या आनंदावर विरजण पडणार आहे.

पावसाळा सुरू होताच डोंगराच्या उंच कड्यावरून कोसळणाऱ्या पांडवकडा धबधब्यावर चिंब भिजण्याची व मनमुराद आनंद घेण्यासाठी पावसाळ्यात पर्यटक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. बुधवारपासून पाऊस पडत असल्यामुळे पाण्याची धार कोसळत आहे. पावसाळ्यात पांडवकडा धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात, मात्र या वर्षी खारघर-तुर्भे लिंक रोडसाठी पांडवकडा धबधब्यालगत डोंगर फोडून बोगदा उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. खारघर डोंगर फोडून निर्माण केल्या जाणाऱ्या भुयारी मार्गाची लांबी १.७६३ किलोमीटर असून भुयारी मार्ग पाच पदरी असणार आहे. हा बोगदा धबधब्याला लागून काढला जात असून बोगदा खोदण्यासाठी लागणारी यंत्रे धबधब्यालगत उभारण्यात आली आहेत. त्यामुळे या वर्षी पावसाळ्यात पर्यटकांना पांडवकडा धबधब्यावर प्रवेश बंदी असणार आहे.

### ◆ स्वतंत्र वीजजोडणीचे काम वेगात

*सायन-पनवेल महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सिडकोकडून ५.४ किलोमीटर खारघर-तुर्भे जोड मार्ग तयार केला जात आहे. मार्गिकेची एकूण लांबी ५.४९० किलोमीटर आहे. यासाठी खारघर डोंगर फोडून बोगदा उभारले जात आहे. बोगद्याचे काम बाराही महिने सुरू असणार आहे. भुयारी मार्गात काम करताना डोंगर फोडण्यासाठी लागणारी यंत्रे, तसेच कामगारांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊन बोगद्यात प्रकाश असावा यासाठी पांडवकडा धबधब्यापर्यंत स्वतंत्र विजेची गरज असल्यामुळे लोखंडी खांब टाकून स्वतंत्र वीजजोडणीचे काम वेगात सुरू आहे.*

### ◆ नाल्यावर तात्पुरता पूल

*खारघर गुरुद्वारापासून पांडवकडा धबधबा पार करताना मोठा नाला आहे. डोंगरावर मुसळधार पाऊस झाल्यास हा नाला दुथडी भरून वाहत असतो. पावसाळ्यात भुयारी मार्गाचे काम सुरू राहणार आहे. डोंगर फोडताना बाहेर पडणारे दगड बाहेर आणताना वाहनास कोणत्याही प्रकारचा धोका होऊ नये यासाठी गुरुद्वारा ते पांडवकडा डोंगरापर्यंत तात्पुरता, परंतु पक्का रस्ता आणि नाल्यावर लोखंडी पूल उभारला जात आहे. सिडकोच्या आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्कदरम्यान थेट कनेक्टिव्हिटी निर्माण होणार आहे. या कामासाठी सिडको २,१०० कोटी खर्च करीत असून हा प्रकल्प ३१ डिसेंबर २०२८ अखेरपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचा सिडकोचा संकल्प आहे.*

## निवडक

### कारच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव वेगाने आलेल्या कारने पादचाऱ्याला धडक दिली. यात ओम गंगाराम तांबे (कामोठे) याचा मृत्यू झाला तर दुसऱ्या दोन कारला दिलेल्या धडकेत कारचे नुकसान झाले. या अपघातप्रकरणी अनिकेत राजेंद्र नलावडे (तळोजा) याच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वेश त्रिपाठी हे कोपरखैरणे येथे राहत असून ते कामावर गेले होते. त्यांची कार रोडपाली सिग्नल ते पुरुषार्थ पेट्रोल पंपाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला रोडपालीसमोर पार्क केली होती. या वेळी त्यांच्या कारच्या समोर नानजीभाई पटेल यांची कार पार्क केली होती. या वेळी आणखी एक कार रोडपाली सिग्नलकडून वेगाने आली आणि रस्त्याच्या कडेने चालणाऱ्या ओम तांबे याला धडक दिली. या धडकेत त्याचा मृत्यू झाला.

### तरण तलावात बालकाचा मृत्यू

**पनवेल :** तालुक्यातील दुंदरेपाडा येथील एका फार्महाऊसमधील तरण तलावात तीन वर्षांच्या बालकाचा बुडून मृत्यू झाला आहे. रुद्र असे या बालकाचे नाव असून या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. विशाल बोदडे (बुलढाणा) आणि त्यांची पत्नी पूर्वी फार्महाऊसमध्ये केअरटेकर म्हणून काम करतात. त्यांच्या मुलाचे रुद्र, विशाल बाहेर गेले होते. त्यांची पत्नी आणि मुलगा फार्महाऊसवर होते. सायंकाळी सहा ते सातच्या सुमारास रूद्र खेळता खेळता तरण तलावात पडला आणि त्यातच त्याचा बुडून मृत्यू झाला. ही घटना विशाल यांच्या पत्नीच्या ध्यानात उशिरा आली.

# सुरक्षिततेच्या दृष्टीने तळोजा पोलिसांचे मॉक ड्रिल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा पोलिसांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड तळोजा या ठिकाणी मॉक ड्रिल राबवले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत, पोलीस उपनिरीक्षक, अधिकारी, अंमलदार, कंपनीचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या मॉकड्रिल मध्ये एका शस्त्रधारी ईसमास ठार करण्यात आले आणि दुसऱ्याला जिवंत पकडण्यात आले.

भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड तळोजा एमआयडीसी या ठिकाणी दोन संशयित शस्त्रधारी इसम घुसले असल्याचा फोन सकाळी ११ वाजून दहा मिनिटांनी नियंत्रण कक्षाला आला. त्यानंतर नियंत्रण कक्षाने पोलीस ठाण्याला याची माहिती दिली. माहिती मिळाल्यानंतर क्यूआरटीच्या पथकाने या ठिकाणी सर्चिंग ऑपरेशन केले. दहशतवाद्यांनी घुसखोरी केली असून, ते कंपनीमध्ये घातपात करण्यासाठी लपून बसले आहेत असे समजून त्यांना शोधून काढण्याचे व त्यांना प्रत्युत्तर देण्याचे आणि सर्वसामान्य माणसाचा बचाव करण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.





या प्रात्यक्षिकामध्ये मोठया संख्येने पोलीस दिसत असल्याने काही काळ परिसरात दहशतवादी आले असल्याची अफवा पसरली होती. या ठिकाणी नेमके काय चालू आहे हे पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. प्रत्येक मिनिटाला तेथे काहीतरी घडत होते. या ऑपरेशनदरम्यान एका शस्त्रधारी व्यक्तीला ठार करण्यात आले तर दुसऱ्या शस्त्रधारी व्यक्तीला जिवंत पकडण्यात आले. बीडीडीएस पथकाकडून जागेची आणि शस्त्रधारी इसमाची तपासणी करण्यात आली. त्यांच्याकडील शस्त्र आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. या ऑपरेशनदरम्यान क्यूआरटीचे दोन जवान जखमी झालेले आहेत तसेच पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

# उरणमध्ये खरीप आढावा बैठक



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरणमधील पंचायत समिती हॉल या ठिकाणी सोमवारी (दि.१९) आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखालील खरीप आढावा बैठक झाली. या वेळी उरण गटविकास अधिकारी समीर वाठारकर, नायब तहसीलदार महेश पाटील, तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ, पनवेल खारभूमी संशोधन केंद्रचे शास्त्रज्ञ वणवे सर, मंडळ कृषी अधिकारी एस डी गटकळ, कृषी पर्यवेक्षक बी वाय धेंडे, एस व्ही लोहकरे, ए डी बुरकुल तसेच उरण तालुक्यातील पुरस्कार प्राप्त शेतकरी, प्रगतशील शेतकरी व इतर शेतकरी वर्ग, तसेच PMFMEमधील महिला व्यवसायिक, महिला बचत गट व कृषी सेवा केंद्र धारक, पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान व FPOचे सदस्य असे एकूण ११५ शेतकरी उपस्थित होते.

या वेळी तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ यांनी खरीप हंगाम २०२५ सभेचे सादरीकरण व नियोजनाचे सादरीकरण केले. या वेळी आमदार महेश बालदी यांनी शेतकऱ्यांच्या विविध अडचणी ऐकून घेतल्या व मार्गदर्शन केले. प्रकाश ठाकूर (वसंतराव नाईक कृषी भूषण पुरस्कार विजेते) व प्रफुल्ल खारपाटील (वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार विजेते) यांना शेतकऱ्यांच्या वतीने प्रतिनिधित्व स्वरूपात मनोगत व्यक्त केले.

कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया उगवण क्षमता चाचणी तसेच भात पिकाचे विविध वाण याबद्दल प्रदर्शन व सखोल माहिती देण्यात आली. तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ यांनी आभार मानले.

# पनवेल महापालिका विद्युत विभागामुळे पेंधर येथील मोठी दुर्घटना टळली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका कार्यक्षेत्रातील खारघर विभागातील पेंधर गावामध्ये बुधवारी (दि.२१) रात्री मुख्य रस्त्यावर महावितरण कंपनीची विद्युत वाहिनीचा प्रवाह सुरू असलेला कंडक्टर रस्त्यावर तुटून पडला होता. त्याचवेळी मनपा विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील काही कौटुंबिक कार्यक्रमासाठी त्याच भागात गेले असता त्यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांना संभाव्य दुर्घटनेची भीषणता लक्षात येताच त्यांनी तत्परतेने पालिकेच्या विद्युत विभागातील पर्यवेक्षक रोहन भोईर यांना तातडीने बोलवून सदरच्या कंडक्टर मधून चालू असलेला विद्युत प्रवाह बंद करण्यास सांगितले. त्यांच्या तत्परतेमुळे मोठी विद्युत दुर्घटना टळली.

या सर्व प्रकरणाबाबत महावितरण कंपनीस अवगत करून पुढील,कार्यवाही करण्यात आली. या कार्य तत्परतेबद्दल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रीतम पाटील यांचे अभिनंदन केले.

पेंधर हे गाव महावितरण कंपनीच्या नावडे विभागात येते. २१मे रोजी रात्री पावसात विद्युत वाहिनीचा कन्डक्टर तुटून पडला, ही बाब विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील यांच्या निदर्शनास आली. पाटील यांनी प्रसंगावधान राखून मनपाच्या विद्युत कर्मचाऱ्यांना सुचना देऊन विद्युत वाहिनीचा वीजपुरवठा खंडित करणेबाबत तत्पर कार्यवाही केली. तसेच महावितरण कंपनीकडे संपर्क साधला.परिणामी विद्युत अपघातामुळे होणारी जीवितहानी टळली आहे.महावितरण कंपनीने याबाबत मनपाचे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## संचालक असल्याचे भासवून तब्बल ७५ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

युवा किसान फार्मर कंपनीची ७५ लाखांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. कंपनीचे आर्थिक व्यवहार सांभाळणाऱ्या कामगाराला अज्ञाताने चॅटिंग करून तो डायरेक्टर असल्याचे भासवून फसवणूक केली आहे.

कंपनीच्या कामोठे परिसरात राहणाऱ्या कामगारासोबत हा प्रकार घडला. हा कामगार रविवारी सुटी असल्याने घरी असताना त्यांना - अनोळखी नंबरवरून व्हॉट्सअॅप मेसेज आला होता. त्या नंबरच्या प्रोफाइलवर त्यांच्या डायरेक्टरचा फोटो होता तसेच मेसेज करणाऱ्याने तो डायरेक्टर असून, त्यांचा नवीन नंबर असल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशी त्या तोतयाने कामगाराला मेसेज करून कामानिमित्त बाहेर असल्याचे सांगितले. शिवाय कंपनीच्या बँक खात्यातून ७५ लाख रुपये पाठवण्यास सांगितले. त्यांच्या सांगण्यावरून कामगाराने नमूद खात्यात ही रक्कम पाठवली. कंपनीचे मूळ डायरेक्टर श्रीकांत कोठावळे यांना खात्यातून पैसे पाठवल्याचे लक्षात आले. त्यानंतर याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## प्रसाद म्हात्रे राज्याध्यक्षपदी

**कळंबोली : बातमीदार**

महाराष्ट्रातील एक नामवंत संघटना महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती या संघटनेच्या राज्याध्यक्षपदी प्रसाद अनंत म्हात्रे, रायगड व राज्य सरचिटणीस पदी आर आर जोशी, जालना यांची निवड झालेली आहे. महाराष्ट्रातील श्रमिक संघ अधिनियम १९२६ नुसार पहिली मान्यताप्राप्त ही प्राथमिक शिक्षक संघटना असून शिक्षकांच्या प्रश्नांसाठी कायम कार्यरत असणारी ही महाराष्ट्रातील संघटना आहे.

२० मे २०२५ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे झालेल्या महामंडळ सभेत संस्थापक दिलीप ढाकणे, राज्यनेते अंकुश काळे, रामदास सांगळे, माजी राज्याध्यक्ष शिवाजीराव साखरे, माजी सरचिटणीस अंजुम पठाण, रवींद्र अंभोरे, महिला आघाडीच्या दीपा देशपांडे, माधव लातूरे यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली.

## प्रवासामध्ये मंगळसूत्र चोरी

**पनवेल :** श्रीवर्धन ते मुंबई या एसटी बसच्या प्रवासात एका घरकाम करणाऱ्या प्रवासी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी झाले. मुंबई येथील कुलाबा येथे राहणारी ३६ वर्षीय महिला मुंबईला एसटी बसमधून प्रवास करत होत्या. त्या पनवेल बस आगारात बस थांबल्यावर त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी झाल्याचे समजले. या घटनेनंतर पीडित महिलेने एक लाख रुपयांचे गळ्यातील मंगळसूत्र चोरी केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदवली.

## मोहोपाड्यातील महेश पाटील सन्मानित

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मुंबईत बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये फूड कॉन्नोइसर्स इंडिया अवॉर्डस (वेस्ट इंडिया एडीशन) कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. यात मोहोपाडा रसायनी येथील मराठी उद्योजक महेश बाळाराम पाटील यांना पुण्यातील सर्वोत्तम चायनीज पाककृतीत बेस्ट रेस्टॉरंट इन पुणे फुड कॉन्नोइसर्स इंडिया अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.



मोहोपाडा येथील महेश पाटील यांनी पुण्यात आपले रेस्टॉरंट सुरू केले आहे. त्यांची मेहनत वाखाणण्याजोगी आहे. त्यांना फुड कॉन्नोइसर्स बेस्ट रेस्टॉरंट इन पुणे अवॉर्डने सन्मानित केल्याने महेश पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## लकी ड्रॉमध्ये जिंकली कार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुझुकी मोटर कंपनी इंडियाच्या वतीने संपूर्ण भारतभर लकी ड्रॉ योजना राबवण्यात आली. या लकी ड्रॉमध्ये पनवेलच्या कनक सुझुकी शोरूममधून दुचाकी घेतलेले दत्ताराम मारुती भगत यांनी चारचाकी कार जिंकली. २१ मार्च रोजी त्यांना ही कार देण्यात आली. संपूर्ण भारतभरातून एकमेव कार विजेते दत्ताराम भगत ठरले.

सुझुकी मोटर कंपनी इंडियाच्या वतीने एक सप्टेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत गाडी घेणाऱ्या ग्राहकांसाठी लकी ड्रॉ स्कीम राबवण्यात आली. रोहा येथील दत्ताराम भगत यांनी सप्टेंबर महिन्यात बर्गमॅन ही दुचाकी पनवेल येथील कनक शोरूम मधून विकत घेतली. त्यामुळे ते या लकी ड्रॉ स्कीममध्ये सहभागी झाले. लकी ड्रॉचा निकाल नुकताच लागला. या वेळी प्रथम मेगा पारितोषिक मारुती सुझुकी फ्रॉन्स ही चार चाकी कार दत्ताराम भगत यांना लागली. २१ मार्च रोजी त्यांना ही कार देण्यात आली.

या वेळी कनक शोरूमचे डायरेक्टर जितेश मारू, सुझुकीचे एरिया मॅनेजर रणवीर सिंह यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. या वेळी लकी ड्रॉमध्ये कार जिंकलेले दत्ताराम भगत यांनी सर्वांचे आभार मानत कार मिळाल्याने आनंद झाला असल्याचे सांगितले आणि नागरिकांनी सुझुकी कंपनीच्या गाडी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

# वृक्षारोपण मोहिमेसाठी शाळा, महाविद्यालये, संस्थांसोबत बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पनवेल महापालिकेने व्यापक वृक्षारोपण मोहिम हाती घेतली आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील विविध जागा, रस्ते दुभाजक तसेच इतर शासकीय जागांवरती वृक्षारोपण मोहीम राबविण्याच्या अनुषंगाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.२२) महापालिका मुख्यालयात महापालिका मनपा कार्यक्षेत्रातील विविध शाळा, महाविद्यालये, एनएसएस विभाग शिक्षक, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनीधींची नियोजन बैठक अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात आयोजित करण्यात आली.



या बैठकिस उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त अभिषेक पराडकर, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, महापालिका कार्यक्षेत्रातील वीसहून अधिक विविध सामाजिक संस्था व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पनवेल महापालिका क्षेत्रात 'माझी वसुंधरा' अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मोकळ्या जागा, रस्ते दुभाजक तसेच इतर शासकीय जागांवरती व्यापक वृक्षारोपण मोहीम राबविण्याच्या दृष्टीने महापालिकेने वृक्ष लागवड समितीची स्थापना केली आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील पर्यावरण संवर्धनासाठी व रक्षणासाठी शहरातील सर्व भागधारकांनी वृक्षारोपण संकल्प आणि प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. यासाठी महापालिकेच्या वृक्ष लागवड समितीच्यावतीने आयुक्त गणेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल शहरातील शाळा, महाविद्यालये प्रतिनिधी, एनएसएस विभाग शिक्षक, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था यांची बैठक घेण्यात आली.

या वेळी अतिरीक्त आयुक्त शेटे यांनी उपस्थित प्रतिनिधींना महापालिकेच्या व्यापक वृक्षारोपण मोहिमेमध्ये सर्वांचे योगदान महत्वाचे असल्याचे सांगितले. या मोहिमेमध्ये सर्वांनी सहभागी होण्याबाबत विनंती केली. तसेच सामाजिक संस्थानी, स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन वृक्ष लागवड केल्यानंतर याचे दायित्व स्वीकारावे. जेणे करून रोपण केलेल्या झाडांची व्यवस्थितरित्या वाढ होईल. यासाठी सामाजिक संस्थांना लागणारी सर्व सहकार्य महापालिकेच्या वतीने करण्यात येणार असल्याचे अतिरीक्त आयुक्तांनी सांगितले.

महापालिकेच्या या प्रस्तावास उपस्थित सर्व शाळा प्रतिनिधींनी, सामाजिक संस्थानी, स्वयंसेवी संस्थांनी एकमताने होकार दिला. तसेच महापालिकेस सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. ही मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी उपस्थितांनीदेखील आपल्या सुचना सांगितल्या. या सर्व सूचनांचे स्वागत करून आतिरीक्त आयुक्तांनी महापालिकेच्या वृक्षारोपण मोहिमेत सहभागी झाल्याबद्दल सर्व सामाजिक संस्थांचे व स्वयंसेवी संस्थांचे आभार मानले.

## संपादकीय

# कथित प्रतिष्ठेचा बळी

गेले काही दिवस पुण्यातील वैष्णवी हगवणे या विवाहितेच्या हुंडाबळीचे प्रकरण माध्यमांमध्ये चर्चेत आहे. प्रगत व पुरोगामी राज्य म्हणवल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात विवाहितेच्या कौटुंबिक छळाची अशी एखादीच घटना कधीमधी उजेडात येते, जी आजही हुंड्याची प्रथा आपल्या समाजात टिकून असल्याचे चव्हाट्यावर आणते. अन्यथा बहुतेक करून कौटुंबिक प्रतिष्ठा जपण्याच्या धडपडीत असे छळाचे प्रकार स्वत: विवाहिता व त्यांच्या कुटुंबियांकडून दडवलेच जातात.

**वैष्णवीचे सासरे राजेंद्र हगवणे हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते होते. परंतु वैष्णवीच्या आत्महत्येनंतर तिच्या छळाचे तपशील बाहेर आल्यानंतर अजित पवार यांनी राजेंद्र हगवणे यांची पक्षातून हकालपट्टी केली. वैष्णवीचा पती शशांक, सासू लता आणि नणंद करिष्मा यांना पोलिसांनी अटक केली असून सासरे राजेंद्र हगवणे आणि त्यांचा दुसरा मुलगा सुशील मात्र अद्याप फरार आहेत. या कुटुंबाच्या मोठ्या सुनेनेही अशाच छळामुळे यापूर्वीच त्यांचे घर सोडले असून तिने पोलिसांत तक्रार नोंदवण्याचा प्रयत्नही तेव्हा केला होता. परंतु पोलिसांनी तिलाच सामोपचाराने प्रकरण मिटवण्याचा सल्ला दिला. पोलिसांनी तेव्हाच कारवाई केली असती तर वैष्णवीही वाचू शकली असती. वैष्णवीच्या आत्महत्येनंतर तिचे अवघ्या नऊ महिन्यांचे मूलही हगवणे कुटुंबाने तिच्या आईवडिलांच्या हाती लागू दिले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वैष्णवीच्या कुटुंबाच्या पाठिशी आपण असून तिला न्याय मिळवून देणारच अशी भूमिका घेतल्यानंतर अज्ञात व्यक्तीकडून ते मूल कस्पटे कुटुंबाच्या हवाली करण्यात आले. आश्चर्याची बाब म्हणजे वैष्णवी आणि शशांक यांचा २०२३ मध्ये मोठ्या थाटामाटात प्रेमविवाह झाला होता. लग्नात वैष्णवीच्या कुटुंबाकडून हुंडा म्हणून तब्बल ५१ तोळे सोने व फॉर्च्युनर गाडी देण्यात आली होती. लग्नानंतरही या न त्या निमित्ताने चांदीच्या वस्तू, दीड लाखांचा मोबाइल आदी देण्यात आले. तरीही वैष्णवीचा जाच करण्यात आला व अवघ्या दोन वर्षांत त्या विवाहाचा असा शेवट झाला. १६ मे रोजी वैष्णवीने गळफास घेतल्याचे शशांकने सांगितले. इस्पितळात वैष्णवीच्या शरीरावर मारहाणीच्या जखमा आणि गळ्यावर लालसर व्रण आढळले असे समजते. या घटनेतील सारेच तपशील आपल्याकडील भरभक्कम विवाहसंस्थेच्या आड दडवला जाणारा व्यवहार व अमर्याद हव्यास उघड करतात. वैष्णवीच्या आईवडिलांनी छळाबद्दल कळूनही सामाजिक प्रतिष्ठेपायी तिलाच वारंवार जुळवून घ्यायला सांगितले. ती वेळीच माहेरी परतली असती तर तिचे प्राण वाचू शकले नसते का? विवाहित स्त्रीच्या जीवापेक्षाही कौटुंबिक प्रतिष्ठा ही अशी मोठी का ठरते? अशातऱ्हेचे हव्यासी, क्रूर वर्तन करणाऱ्या पुरुषासोबतचा विवाह टिकवून ठेवण्याचा सल्ला विवाहितांना का दिला जातो? लग्नसमारंभांवर वारेमाप खर्च करताना, पोशाखी डामडौलात मग्न राहताना ज्याच्याशी जन्मभराचे नाते जोडले जाते आहे तो पती व त्याचे कुटुंबीय वृत्तीने कसे आहेत हे तपासणे महत्त्वाचे का वाटत नाही? त्याऐवजी त्यांच्या सामाजिक, आर्थिक प्रतिष्ठेला भूलून नाती का जुळवली जातात असे अनेक प्रश्न या प्रकरणाने उपस्थित होत आहेत. राजकीय पक्षाशी संबंध असल्याने या प्रकरणातील तपशील उघड तरी झाले. विवाह झाल्यावर नात्याचे स्वरूप कितीही नकारात्मक असले तरी ते नाते टिकवूनच ठेव असा दबाव जोवर विवाहितांवर येत राहील तोवर त्यांचे हे असे बळी जाणे थांबण्याची शक्यता नाही.**

# या गावांनी सुरुवात केलीय, तुम्ही कधी करणार?





सांगली जिल्ह्यातल्या कडेगाव तालुक्यातलं मोहित्यांचं वडगाव . पहिल्या मानवनिर्मित सागरेश्वर अभयारण्याचे जनक, दिवंगत वृक्षमित्र धों. म. मोहिते या अवलियाचं हे गाव. संध्याकाळी ७ वाजता इथल्या ग्रामपंचायतीवर बसवलेला भोंगा वाजतो. त्या कर्ण्यावरून आठवण करून दिली जाते आणि घराघरातले टीव्ही पटापट बंद होतात. मोबाईल खाली ठेवले जातात. दीड तास सगळं बंद.

बायका टीव्हीसमोरून हलतात. चुलीसमोर जातात, तर पोरं अभ्यासाला. या वेळेत पोरं रस्त्यावर दिसली की, त्यांना अभ्यासाची आठवण करून देत घरी पाठवलं जातं. दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील मालिकांच्या कचकड्याच्या दुनियेत गुरफटलेल्या बायकांना आणि मोबाइलच्या मोहजालात अडकत चाललेल्या पोरांना आभासी जगापासून वास्तवात आणण्याचा हा प्रयत्न!

शेजारच्या पलूस तालुक्यातल्या भिलवडीत सकाळी नऊला भोंगा सुरू होतो. त्यावरून सूचना दिली जाते आणि सगळे स्तब्ध होतात. रस्त्यावरच्या गाड्याही जागेवर थांबतात. लोक असतील तिथं उभं राहतात. राष्ट्रगीत सुरू होतं. बावन्न सेकंदांनंतर पुन्हा सगळे आपापल्या कामाला लागतात. उत्साहानं आणि देशभक्तीची प्रेरणा घेऊन हा दोन वर्षांपासूनचा पायंडा, व्यापारी संघटनेनं पाडलेला.

कुलाळवाडी हे जत तालुक्यातल्या पूर्व भागातलं ऊसतोड मजुरांचं गाव. साखर कारखान्यांचा हंगाम सुरू झाला की, पुरुषमाणसं बायका-पोरांना घेऊन ऊसपट्ट्यातली गावं जवळ करतात. दिवसभर बापयगडी, बायका ऊसतोड करण्यात गुंततात, तेव्हा पालावर साताठ वर्षांवरची पोरंच कच्च्याबच्च्यांना सांभाळत असतात.

आईबापामागं जाताना गाव सोडल्यामुळं शाळेत जाणाऱ्या पोरांची शाळा सुटते. साखर कारखान्यांनी काढलेल्या साखरशाळाही चालत नाहीत. या पोरांना गावाकडं ठेवता येत नाही, कारण घरात मागं राहिलेली म्हातारी कोतारी कशीबशी जगत असतात, मग या पोरांना भाकरतुकडा कोण करून घालणार? त्यांना कोण सांभाळणार? त्यांच्या वाट्याला आबाळच.

यावर उपाय म्हणून कुलाळवाडी गावातल्या गुरुजींनी पोरांना चुलीवर नागे भाकरी करायला शिकवलं. भाकरी करण्याच्या स्पर्धा घेऊन बक्षिसं दिली. ऐंशी-नव्वद पोरं भाकरी करायला शिकली आणि त्यांची आईबापामागं जायची फरफट थांबली. ती गावात थांबून शाळेतच शिकू लागली. गावानंही त्यांना जगण्याचं बळ दिलं.

सांगलीजवळच्या बिसूरसारख्या काही गावांनी मृताच्या रक्षाविसर्जनालाच सर्व विधी आटोपून सुतक संपवायचा निर्णय घेतला. त्यात मराठा समाजातल्या जाणत्यांनी पुढाकार घेतला. गेल्या काही वर्षांत शेजारच्या गावांतल्या भावक्यांनीही तोच कित्ता गिरवला. अलीकडं पर्यावरण जपण्यासाठी गावं शहाणी व्हायला लागलीत. मृताची रक्षा नदी तलावाच्या पाण्यात विसर्जित करण्याऐवजी झाडांना घालण्याचा आदर्श समोर ठेवला जातोय.

तिकडं कोल्हापुरातल्या हेरवाड गावानं तर पुढचं पाऊल टाकलं. गावात विधवा प्रथेला मूठमाती दिली. नवऱ्याच्या निधनानंतर बायकोचं कुंकू पुसणं, गळ्यातलं मंगळसूत्र काढणं, हातातल्या बांगड्या फोडणं, पायातली जोडवी काढणं, धार्मिक-सामाजिक कार्यात डावलणं हे सगळं बाईला जिवंतपणी जाळण्यासारखंच.

सौभाग्यलेणी हिरावून घेणं म्हणजे सतीच्या चटक्यांपेक्षा भयानक त्यामुळं या गावानं विधवा प्रथा बंद करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. असा निर्णय घेणारं राज्यातलं हे पहिलंच गाव. नंतर राज्य शासनानंही तसा निर्णय घेण्याचं आवाहन ग्रामपंचायतींना केलं. बघताबघता सगळीकडं अनुकरण होऊ लागलं.

आता या विधवाप्रथा बंदी निर्णयाच्याही पुढं जाऊन कोल्हापूर जिल्ह्यातल्याच दोन ग्रामपंचायतींनी विधवांना पुनर्विवाह करण्यासाठी ११ हजारांचं अनुदान जाहीर केलंय. शिरोळ तालुक्यातली टाकळीवाडी आणि राधानगरी ही ती दोन गावं. या ग्रामपंचायतींनी विधवांना कार्यक्रमांमध्ये हळदी-कुंकवासाठी बोलावणंही सुरू केलं. सांगली-कोल्हापूर-साताऱ्यातल्या काही गावांनी महिला सन्मान समितीच स्थापन केली, तर काहींनी धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात विधवांचं पूजन सुरू केलं. त्यांच्या हस्तेच झेंडावंदन, पायाभरणी, उद्घाटनांचा घाट घातला. हा नवा दिशादर्शक वस्तुपाठ !

ही सगळी पश्चिम महाराष्ट्रातली गावं. जिथं महात्मा जोतिबा फुल्यांनी सामाजिक क्रांतीची बीजं रूजवली, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी पुरोगामी विचारांची कृतिशील पेरणी केली, क्रांतिसिंह नाना पाटलांनी ग्रामोद्धाराचा धडा शिकवला.

या गावांना वाटलं, आता बदललं पाहिजे. नवतेचा आग्रह धरत अनिष्ट रूढी परंपरांचं जोखड झुगारून दिलं पाहिजे. कर्मकांडांना फाटा दिला पाहिजे, एकत्र येऊन निर्णय घेतले पाहिजेत. बुरसटलेल्या विचारांचं विसर्जन करताना आधुनिकतेचा अतिरेकही पाचर मारून रोखायला हवा. गाव करील ते राव काय करील' याचा प्रत्यय आणून द्यायला हवा.

तसं महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात मागील सहा दशकांत प्रचंड उलथापालथ झाली. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक पातळीवर चढउतार दिसून आले. इथल्या समाजधुरिणांनी पुरोगामी परिवर्तनावादी महाराष्ट्राचं स्वप्न पाहिलं होतं.

त्यानुसार खेड्यांचा सर्वांगीण विकास केंद्रबिंदू मानून पहिली दशकं महाराष्ट्राची वाटचाल सकारात्मक पद्धतीनं सुरू झालेली. स्वातंत्र्य आंदोलनाच्या मुशीतून तयार झालेल्या ध्येयवादी नेतृत्वानं विकासाभिमुख राजकारणाला प्राधान्यक्रम देऊन आश्वासक प्रगतीकडे वाटचाल सुरू केली;

पण १९८० नंतर नागरीकरणाच्या झपाट्यात खेड्यांचा सर्वांगीण विकास मागं पडत गेला. गावखेड्यांत कमीत कमी राजकारण आणि अधिकाधिक समाजकारण अर्थकारण या मूल्यांवर आधारित वाटचाल अभिप्रेत होती. प्रत्यक्षात मात्र १९८० नंतर सत्ताकेंद्री स्पर्धात्मक राजकारणाचा उदय झाल्यामुळं ही वाटचाल अगदी विरुद्ध दिशेनं झाली.

दुसऱ्या बाजूला सामाजिकदृष्ट्या राहणीमानातला बदल स्वीकारला गेला, पण गावातलं गावपण कानकोंडं होऊ लागलं. त्यामुळंच वेगळं काहीतरी करण्याची ऊर्मी तयार झाली... आणि छोटेछोटे पण दीर्घकालीन परिणाम करणारे बदल गावकरी घडवू लागलेत; त्याची ही कहाणी इतर गावानांही यांचा आदर्श घेण्यासारखा आहे असे झाले तर राज्यातील खेड्यात निश्चीतच परिवर्तन होइल

**-श्रीनिवास नागे**



## बदलते तंत्रज्ञान

### इन्स्टाग्रामचे नवीन एडीट ॲप!

आपल्यातील अनेक जण आज कन्टेन्ट क्रिएटरच्या क्षेत्रात उतरताना दिसत आहेत. दिवसभरात आपण काय करतो याची छोटीशी झलक मिनी ब्लॉगद्वारे, इन्स्टाग्राम रील्सद्वारे दाखवली जाते. पण, हे सगळे छोटे छोटे क्षण एकत्र करून दाखविण्यासाठी तो व्हिडीओ एडिटसुद्धा करावा लागतो. तर आजकाल लॅपटॉपर नाही, तर मोबाईलमध्येच व्हिडीओ एडिट करतात. तुम्हाला मोबाईलवर व्हिडीओ एडिट करायला आवडत असेल, तर ही बातमी खास तुमच्यासाठीच आहे. कारण- आता इन्स्टाग्रामने व्हिडीओ एडिट करणाऱ्यांचा विचार करून एक खास ॲप आणले आहे.



मेटाने टिकटॉकच्या कॅपकटप्रमाणेच एडिट्स (एवळी) हे व्हिडीओ एडिटिंग ॲप सादर केले आहे. एडिट्स हे एक मोफत ॲप आहे, जे तुमच्या विचारांना इन्स्टाग्राम रील्समध्ये रूपांतरित करण्यासाठी विविध फीचर्ससुद्धा देते. हे ॲप अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही युजर्ससाठी उपलब्ध असणार आहे.

जानेवारीमध्ये अमेरिकेने टिकटॉक आणि कॅपकटवर बंदी घालण्याची घोषणा केली तेव्हा मेटाने पहिल्यांदा एडिटस् लाँच करण्याची घोषणा केली होती. कॅपकट भारतात कधीही उपलब्ध नव्हते. पण, ते अमेरिकन युजर्समध्ये एक लोकप्रिय व्हिडीओ एडिटिंग ॲप होते. ॲप बंदीमुळे एक पोकळी निर्माण झाली असती, ज्याचा फायदा घ्यायचा, असे इन्स्टाग्रामने ठरवले.

इन्स्टाग्राम एडिटस् ॲप युजर्सना फोनच्या कॅमेऱ्याचा वापर करून फुटेज कॅप्चर करण्याची आणि कोणत्याही वॉटरमार्कशिवाय त्यांचे प्रोजेक्ट एक्स्पोर्ट करण्याची परवानगी देतो. हे प क्लिप-लेव्हल प्रिसिजन, ऑटो-एनहान्स टूल्स व एआय इमेज निमेशन यांसारख्या फीचर्ससह अचूक नियंत्रणसुद्धा देईल. ते क्रिएटर्सना ट्रेंड समजून घेण्यास आणि त्यानुसार व्हिडीओ तयार करण्यास मदत करण्यासाठी कन्टेंटसुद्धा देईल.थर्ड-पार्टी व्हिडिओ एडिटिंग ॲप्सव्यतिरिक्त एडिट्स युजर्सना मेटाच्या लायब्ररीमधून गाणे ॲक्सेस करण्याची परवानगी देईल. थ्रेड्सप्रमाणेच एडिट्स वापरण्यासाठी युजर्सचे इन्स्टाग्राम अकाउंट असणे आवश्यक आहे. त्यामुळे एका क्लिकवर परफॉर्मन्स ट्रॅक करणे आणि कन्टेन्ट इन्स्टाग्रामवर शेअर करणेदेखील सोपे होते.

# संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे



**निमित्त**

२३ मे १८९६ रोजी अमरावती येथे केशवराव भोळे यांचा जन्म झाला. मराठी व शास्त्रीय संगीत समीक्षा केशवराव भोळे यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. मराठी भावसंगीताचे जनक, नाट्यसंगीत विचाराला योग्य दिशा देणारे व्यक्तिमत्त्व अशीही केशवरावांची ख्याती होती. केशवराव भोळे यांचे वडीलही संगीताचे शौकीन होते. ते स्वतः सतारही वाजवीत असत. केशवरावांचा जन्म होण्यापूर्वीच त्यांचे वडील वारले. तथापि घरातील संगीतमय वातावरणामुळे केशवरावांना लहानपणापासूनच नाटक-संगीतादी पाहण्या-ऐकण्याचा नाद लागला आणि तो वाढत जाऊन अखेरपर्यंत टिकला.

वैद्यकीय अभ्यासासाठी ते मुंबईस आल्यावर ह्या नादाला खोली आणि चौरसपणा येऊन तो इतका वाढला, की त्यांनी वैद्यकीय अभ्यासावर पाणी सोडले. ह्याच सुमारास त्यांचा दुर्गा केळेकर (विवाहोत्तर ज्योत्स्ना भोळे) ह्यांच्याशी विवाह झाला.

ज्योत्स्ना भोळे यांनीही कालांतराने संगीत-नाटकाच्या क्षेत्रांत चांगला नावलौकिक संपादन केला. जुलै १९३३मध्ये 'नाट्यमन्वंतर' या संस्थेच्या आंधळ्यांची शाळा ह्या श्री. वि. वर्तकलिखित प्रसिद्ध नाटकामध्ये त्यांनी केलेले पहिलेच बिंबाचे (नायिका) काम अतिशय गाजले. केशवरावांचाही 'नाट्यमन्वंतरा'शी संबंध जडला. 'आंधळ्यांची शाळा'मध्ये ज्योत्स्नाबाईंनी गायलेल्या दोन गाण्यांची भावपूर्ण स्वररचना केशवरावांनीच केली होती. ह्या सर्वांमुळे केशवराव संगीताचे नवरचनाकार म्हणून प्रसिद्धीस आले. १९३३ साली गोविंदराव टेंबे ह्यांच्या नंतर केशवरावांनी 'प्रभात' ह्या सिनेमा कंपनीत संगीतदिग्दर्शक म्हणून प्रवेश केला.

'प्रभात' कालखंडात केशवरावांची स्वररचनाकाराची वृत्ती फुलून आली. हा बहर अमृतमंथन, संत तुकाराम, कुंकू, माझा मुलगा, संत ज्ञानेश्वर, संत सखू, चंद्रसेना इत्यादी बोलपटांमधील गीतांच्या त्यांनी केलेल्या स्वररचनांमध्ये आणि संगीताच्या दिग्दर्शनामध्ये भरपूर दिसून येतो. त्यांखेरीज कित्येक सुट्या भावगीतांनाही त्यांनी चाली लाविल्या. हा प्रामुख्याने त्यांचा निर्मितिकाल मानता येईल.

पुढे ते आकाशवाणी मुंबई केंद्राच्या संगीत विभागाचे प्रमुख झाले. 'एकलव्य' ह्या टोपणनावाने केशवराव भोळे ह्यांनी वसुंधरा ह्या साप्ताहिकात लिहिलेले अभिजात गायक-गायिकांविषयीचे अनेक लेख त्यांच्या रमणीय शैलीमुळे आणि माहितगारीमुळे विख्यात झाले. तेच लेख पुढे आजचे प्रसिद्ध गायक (१९३३) ह्या पुस्तकात संग्रहित करण्यात आले. ह्या पुस्तकाची सुधारून वाढविलेली आवृत्ती म्हणजे संगीताचे मानकरी (१९४९) होय.

केशवराव भोळे यांनी नंतर 'शुद्ध सारंग' ह्याही टोपण नावाने लेख लिहिले. त्यांत त्याची चिकित्सावृत्ती, परखडपणा, बोचरेपणा इत्यादी गुण विशेष दिसून येतात. आवाजाची दुनिया, अस्ताई, वसंतकाकाची पत्रे, माझे संगीत, अंतरा आणि जे आठवते ते हे आठवणीवजा आत्मचरित्रसुद्धा त्यांनी लिहिले. केशवराव भोळे यांचे नऊ नोव्हेंबर १९७७ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




# आरोग्य प्रहर

## बहुगणी लवंग आहारात का असावी?

लवंग तिखट, कडू रसाची असून लघु गुणांची म्हणून डोळ्यांना हितकारक आहे.

लवंगेचा एक काळ सर्दी, पडसे किंवा खोकल्याकरिता घरगुती औषध म्हणून मोठा वापर होता. अतिमहागाईमुळे किंवा ज्याच्या बहुऔषधी उपयुक्ततेची तितकी माहिती नसल्याने लवंग कोणाच्याच घरात नसते. आजच्या महाग औषधांच्या राज्यात तुलनेने स्वस्त लवंग पुन्हा घरोघर वापरात यावयास हवी.लवंगेचे संस्कृत नाव देवकुसुम आहे. दाबल्यानंतर ज्यातून तेल निघते ती लवंग चांगली. लवंगेचे तेल पाण्यापेक्षा जड असते. लवंग तिखट, कडू रसाची असून लघु गुणांची म्हणून डोळ्यांना हितकारक आहे. पाचक व रुची उत्पन्न करणारी प्रामुख्याने कफ विकारावर व काही प्रमाणात पित्त व कफ विकारावर काम करते.



ग्रंथाप्रमाणे लवंग अग्निप्रदीपक, पोटदुखी, तहान, खोकला, कफ, दमा, उचकी, क्षय, मुखदुर्गंधी, उलटी, पोटदुखी, रक्तविकार इत्यादींवर काम करते.लवंगेचा फाजील वापर केल्यास डोळे, मूत्राशय व हृदयावर परिणाम वाईट होतो. तोंड येते, जिभेला जखम होते. आयुर्वेद शास्त्राप्रमाणे प्राणवह स्त्रोतसाच्या सर्व विकारात लवंग उत्तम काम करते.

सर्दीने सतत नाकवाहत असेल तर एकएक करून तीन-चार लवंग लागोपाठ चघळाव्या. सर्दी लगेच थांबते. लवंगेत तेल आहे. त्याचा विशद गुण आहे. त्यामुळे घसा, गळा, गाल, जीभ सर्व स्वच्छ राहते.लवंगेचे तेल सर्दीकरिता अत्यंत उपयुक्त आहे. रुमालावर दोन थेंब तेल टाकले की, त्याच्या हुंगण्याने नाक मोकळे होते. सवय लागत नाही.

कपाळावर लवंग, सुंठ व वेखंड असा उगाळून गरम गरम लेप लावावा. जुनाट सर्दी बरी होते. तोंडात घाण वास येत असल्यास लवंग तेल व पाणी अशा गुळण्या कराव्या. दुखऱ्या दातांकरिता लवंग तेल, कापूस व किंचित तूप असा बोळा ठेवावा. तेल फार वापरू नये.

बाजारात दाताच्या आरोग्याकरिता लवंग असलेली टूथपेस्टची जाहिरात असते. या जाहिरातीच आहेत हे लक्षात ठेवावे. दाताच्या आरोग्याकरिता त्याऐवजी गेरू, कात व किंचित लवंग चूर्ण हे उत्तम दंतमंजन दातांच्या पायोरिया या विकारात उपयोगी पडते. वृद्धांच्या ठसका, खोकला, आवाज बसणे, गाणारे गायक किंवा वक्ते, अध्यापक यांच्याकरिता लवंग नेहमी जवळ असावी

# सौंदर्यीकरण, सशक्तीकरण आणि मजबुतीकरणावर वनविभागाचा विशेष भर

## वनमंत्री गणेश नाईक यांचे कर्जतमध्ये प्रतिपादन



**रायगड : रामप्रहर वृत्त**

वनपरिक्षेत्र अधिकारी, माथेरान कार्यालय व तपासणी नाका या नूतन इमारतीचे उदघाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते आज करण्यात आले. वनमंत्री या नात्याने वनविभागाचे सौंदर्यीकरण, सशक्तीकरण आणि मजबुतीकरण करण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

कर्जत येथील माथेरान वन क्षेत्रपाल कार्यालय आणि शेलू येथील तपासणी नाका यांचे उद्घाटन सोहळ्यास आमदार महेंद्र थोरवे, राज्याचे प्रधान सचिव वन बाल प्रमुख शोमिता विश्वास, मुख्य वन संरक्षक ठाणे के प्रदिपा, उपवनसंरक्षक राहुल पाटील, प्रांताधिकारी प्रकाश संकपाल, पनवेल माजी नगराध्यक्ष सुनील घरत आदी उपस्थित होते.

या वेळी वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, माझे वन ही शासनाची नाविन्यपूर्ण योजना असून या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक रेंजमध्ये सुरंगी आणि बहाडोली या जांभळाच्या जातीची झाडे १०० एकर मध्ये लावा. या योजनेमध्ये प्रत्येक कार्यरत वन कर्मचारी यांनी वन विभागाचे कार्यक्षेत्रातील वनांपैकी कोणतेही १ एकर क्षेत्राची निवड करुन सन २०२५ चे पावसाळ्यांत, स्वेच्छेने व स्वखर्चाने त्यांच्या पसंतीच्या वृक्षांची लागवड करावयाची आहे. तसेच निश्चित केलेल्या क्षेत्रातील वृक्षांचे संपूर्ण संरक्षण व संगोपन करण्याचे आहे. या योजनेंतर्गत वनीकरण केल्यास एकूण कार्यरत पदांप्रमाणे साधारणतः ३३८ एकर क्षेत्रावर सन २०२५चे पावसाळयात वनीकरण होणार आहे. माझे वन योजनेमुळे वनीकरणावर वैयक्तिक दृष्ट्या लक्ष दिले जाणार असल्याने, अवनत वनांचे वनीकरण होऊन वृक्षाच्छादन वाढण्यास भरीव मदत होणार आहे, असा विश्वास मंत्री नाईक यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले पारंपरिक रस्ते आहेत त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अडथळे वन विभाग आणणार नाही आणि ते रस्ते डांबरीकरण केले जाईल.संयुक्त वन व्यवस्थापन ही योजना माझ्या कार्यकाळात सुरू झाली. त्यातून जंगले वाढली आहेत. कर्जत तालुक्यात वन उद्यान उभारण्यासाठी लागणारा आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जाईल असेही त्यांनी सांगितले. वन जमीन २१ टक्के असून माझ्या काळात पाच टक्के जमीन वाढवली जाईल असे शब्द दिला आमदार महेंद्र थोरवे यांनी राज्यमार्ग ७६ वरील काही ठिकाणी वन विभागाने रस्त्यांची कामे थांबली आहेत. कर्जत हे ग्रीन कर्जत हब व्हावे यासाठी कर्जतमध्ये सुंगांधी झाडे लावावीत अशी मागणी यावेळी केली. वन विभागाच्या राज्याचे प्रधान वन बल प्रमुख शोमीता विश्वास यांनी वन संरक्षण समिती यांचा जंगल राखण्यासाठी मोठा सहभाग राहिला असून ए आय तंत्रज्ञानाची मदत घेऊन वन वणवे रोखण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे सांगितले तसेच माझे वन ही संकल्पना भविष्यात संपूर्ण राज्यात राबविण्यासाठी वन विभाग धोरण निश्चित करेल, असे सांगितले.

या वेळी जागतिक दर्जाच्या ब्लू फ्लॅग प्रमाणपत्रसाठी नागाव ग्रामपंचायत आणि वनविभाग यांच्या मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. तसेच एआय तंत्रज्ञानसाठी युनिव्हर्सल बिझनेस स्कूल बरोबर सामंजस्य करार करण्यात आला.

उपवनसंरक्षक राहुल पाटील यांची संकल्पना असलेल्या माझे वन या योजनेचे लोकार्पण वनमंत्री यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. तसेच वनसंरक्षण आणि वनसंवर्धन यामध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी केले. या वेळी त्यांनी अलिबाग वनविभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची आणि माझे वन यासंकल्पनेबद्दल माहिती दिली.

## माथेरानचा १७५वा वाढदिवस साजरा

**माथेरान : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थळाचा १७५ वा वाढदिवस पर्यटक आणि येथील स्थानिक नागरिक यांच्या समक्ष येथील व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष तथा माथेरान भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस राजेश चौधरी,भाजपचे माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांतजाधव यांच्या पुढाकाराने सर्व महिला पदाधिकारी आणि पर्यटकांच्या साक्षीने साजरा करण्यात आला.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहराचा १७५ वा वाढदिवस माथेरान व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष राजेश चौधरी,माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव,माथेरान भारतीय जनता पार्टीच्या महिला पदाधिकारी यांच्या पुढाकाराने माथेरान पर्यटन स्थळाचा १७५ वा वाढदिवस येथील मुख्य बाजार पेठे मध्ये असलेल्या श्रीराम चौकात उपस्थित पर्यटकांच्या साक्षीने केक कापून अगदी थाटात आणि फटाक्यांची आतिषबाजी करीत उत्साहात साजरा केला.

माथेरान नगरपरिषद अधिकारी वर्ग सुट्ट्यांवर असल्याने या १७५ व्या वाढदिवसाकडे परिषदेचे दुर्लक्ष झाले.मात्र माथेरान मधील स्थानिकांनी सकाळ पासून सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव करीत आपल्या शहराचा वाढदिवस आनंदात आणि उत्साहात साजरा केला.



## खालापूर थेरेपी सेंटरचे नूतनीकरण

**अलिबाग : प्रतिनिध**

खालापूर तालुक्यात अद्यावत करण्यात आलेल्या थेरेपी सेंटरचे उद्घाटन नुकतेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. या थेरपी सेंटरमध्ये तालुक्यातील १८ वर्षापर्यंतच्या ३५८ दिव्यांग विद्यार्थ्यांवर उपचार करण्यात येत असून, या थेरेपी सेंटरमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्याचे धडे दिले जात आहेत. या स्तुत्य उपक्रमाबाबत नेहा भोसले यांनी खालापूर पंचायत समितीचे कौतुक केले.



पंचायत समिती खालापूर व समग्र शिक्षा अभियान यांच्या माध्यमातून खालापूर तालुक्यातील अठरा वर्षापर्यंत वयोगटातील शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी थेरपी सेंटरची उभारणी करण्यात आली आहे. या थेरपी सेवेचा लाभ तालुक्यातील ३५८ दिव्यांग विद्यार्थी घेत आहेत. यामुळे तालुक्यातील गोरगरीब दिव्यांग विद्यार्थ्यांना उत्तम प्रतीचे उपचार उपलब्ध होत आहेत. खालापूर तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या थेरपीची गरज लक्षात घेऊन सहाय्यक प्रशासन अधिकारी संजीव चोपडे यांनी अपंग कल्याण निधीच्या मदतीने समाविष्ट शिक्षण टीमच्या साह्याने थेरेपी सेंटरची सुरुवात केली होती. सध्या थरपी सेंटर साहित्य सह अद्यायावत करण्याची गरज होती ही गरज लक्षात घेऊन खालापूर पंचायत समिती गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी मुख्यमंत्री शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत थेरपी सेंटरचे सर्व सुविधांसह सुशोभीकरण केले आहे.

थेरपी सेंटरचे उद्घाटन प्रसंगी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, खालापूर गट विकास अधिकारी संदीप कराड, खालापूर प्रभारी सहाय्यक गट विकास अधिकारी प्रभाकर बोरकट, गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमोले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अनिलकुमार शहा यांच्यासह खालापूर पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर थेरेपी सेंटरमध्ये प्रोफेशनल थेरेपिस्ट मार्फत सेरेब्रल पाल्सी , बहु विकलांग, मतिमंद, ऑटिझम, अस्थिव्यंग, ऑपरेशन झालेले विद्यार्थ्यांसाठी ऑक्युपेशनल थेरपी व फिजिओथेरपी मोफत दिली जाते. यासह वाचादोष कर्णबधिर मतिमंद या विद्यार्थ्यांना स्पीच थेरपी मोफत दिली जाते. तसेच विशेष उपक्रम म्हणून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक कौशल्य देखील शिकविले जात आहे. त्यामध्ये विविध सणासुदीला दिवे बनवणे, शोभेची फुले बनवणे व इतर गोष्टी शिकविल्या जातात.

## दिव्यांगावर मात करून मेढ्याची रूपाली सुतार झाली एसएससी!

**रोहे : प्रतिनिधी**

हेल्पर्स ऑफ दि हँडीकॅप्ड संस्थेच्या रूपाली सुतार हिचे यश वाखणजोगा आहे. अधीच दिव्यांग, हलाखीचे जीवन सोबतीला, पण वय शिक्षणाचं, उदरनिर्वाहाची गरज, जिद्द, चिकाटी व सकारात्मक मानसिकतेतुन दिव्यांगवर मात करून कमवा व शिकवा या माध्यमातून रोहा तालुक्यातील मेढा येथील रूपाली सुतार कोल्हापुरातुन तिला दहावीला ७७ टक्के गुण मिळाले असून तीचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. दिव्यांगासाठी काम करणाऱ्या हेल्पर्स ऑफ दि हँडीकॅप्ड संस्थेच्या रोशनी देशमुखचे सहकार्य तील मिळाले आहे.



चौथीत अपूर्ण राहिलेले रूपालीचे शिक्षण व मधल्या काळातील खूप मोठी दरी ही भरून काढण्यासाठी समर्थचा संपूर्ण स्टाफ व तानाजी देसाई यांनी अतोनात प्रयत्न केले.

रूपाली हिला एकदाचे दहावीला बसण्याची अनुमती व योग्य ते मार्गदर्शन मिळाले. सर्व शिक्षकांनी रूपालीवर खूप मेहनत घेतली. मात्र तरीही एक अडचण येत होती ती म्हणजे रूपाली कमवा व शिका या योजने अंतर्गत संस्थेमध्ये दाखल झाले असल्याकारणाने रूपालीला तिचे काम सांभाळून शिकायचे होते व शिकून त्याचे काम ही सांभाळायचे होते. घरंदा विभागातील सर्व स्टाफ तिच्या शिलाई युनिटचे सुबोध दादा व शैलाताई गरड यांनी देखील रूपालीचे खूप मदत केली तिला सहकार्य केले. त्यांनी तिला अनुमती दिली.


### कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

**कुबनप/महिला व बालकल्याण विभाग/०६/२०२५–२०२६** **दिनांक : २४/०४/२०२५**

**ई–निविदा सूचना**
**क्रमांक–३/२०२५–२०२६**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत वॉर्ड क्र. ४१ मधील गरजू महिला व विद्यार्थ्यासाठी मोफत फॅशन डिझायनिंग व पाककला विषयाचे प्रशिक्षण देणे करिता महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहे.

सदर कामाचे निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.२३/०५/२०२५ ते ०२/०६/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे. व सदर निविदा शक्य झाल्यास दि.२/६/२०२५ ते दि. ०३/६/२०२५ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील. निविदे बाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या सुचना फलकावर व महिला बालकल्याण विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव**


## महिलेला ब्लॅकमेल करून अत्याचार

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका विवाहित महिलेशी जवळीक करून अत्याचार करण्यात आल्याची घडली आहे. तुझे अश्लिल फोटो नवऱ्याला दाखविल अशी धमकी देवून आरोपी याने या विवाहितेशी अत्याचार करून भावनिक छळ केला. व त्याचे अश्लिल व्हिडीओबनवून फिर्यादी यांना ब्लॅकमेल करून धमकी दिली. आरोपीने फिर्यादी यांचा मानसिक व भावनिक छळ केला. याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय. प्रकाश माळी अधिक तपास करीत आहेत


### पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.२१७/२२०/२०२५ दिनांक :– २२/०५/२०२५

**आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता पात्र अनुभवी सल्लागाराकडून जाहिर ई–निविदा मागवित आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | PMC/CE/09/ 2025-26 | पनवेल महानगरपालिकेच्या सल्लागाराची ५ वर्षाकरीता (प्रथम ३ वर्षे समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षे मुदतवाढ) निवडसूचीचे विस्तार (Empanelment) करणे. |

या कामाच्या ई–निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर **दि. २६/०५/२०२५** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**( गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त I**
**पनवेल महानगरपालिका**



### ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे

ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीरात सूचना क्र. २ सन २०२५/२०२६** दिनांक २३/०५/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड हे गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील विकास कामाच्या अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम ठराव नं./ मा.स. दि. | इसारा १% रक्कम (ना परतावा) | निविदा फॉर्म फी | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लाडीवली येथे २० संच हेडर बसविणे. | रु. १८७०००/– मा.सभा २८/०३/२०२५ ठराव नं १०१ (११)२ | १८७०/– | ५०० | ०३/०६/२०२५ | १ महिने | ग्रामनिधी |
| २ | चिंचेचीवाडी आदिवासीवाडी येथे समाज मंदिर दुरुस्ती करणे | रु. १५००००/– मा. सभा २८/०४/२०२५ ठराव नं १०१ (११)१ | १५००/– | ५०० | ०३/०६/२०२५ | ३ महिने | १५ वित्त आयोग २५–२६ |
| ३ | लाडीवली रामवाडी सभामंडप बांधणे. | रु. १९१५५४/– मा. सभा २८/०४/२०२५ ठराव नं १६ (३) | १९१५/– | ५०० | ०३/०६/२०२५ | ३ महिने | १५ वित्त आयोग २५–२६ |
| ४ | लाडीवली राजेंद्र म्हामणकर ते परशुराम शेडगे गटार बांधणे. | रु. १४००००/– मा. सभा २८/०४/२०२५ ठराव नं १६(४) | १४००/– | ५०० | ०३/०६/२०२५ | ३ महिने | १५ वित्त आयोग २५–२६ |
| ५ | आकुळवाडी किसन मालुसरे ते दामोदर पवार रस्ता C.C करणे. | रु. २८००००/– मा. सभा . २८/०४/२०२५ ठराव नं १६ (५) | २८००/– | ५०० | ०३/०६/२०२५ | ३ महिने | १५ वित्त आयोग २५–२६ |
| ६ | गुळसुंदे स्मशानभूमी दुरुस्ती करणे. | रु. १४६४६९/– मा. सभा २८/०४/२०२५ ठराव नं १६ (६) | १४६४/– | ५०० | ०३/०६/२०२५ | ३ महिने | १५ वित्त आयोग २५–२६ |
| ७ | गुळसुंदे बौद्धवाडी समाजमंदिर जिना शेड व ग्रील करणे, | रु. ३०००००/– मा. सभा २८/०४/२०२५ ठराव नं १६ (७) | ३०००/– | ५०० | ०३/०६/२०२५ | ३ महिने | ग्रामनिधी १५% |
| ८ | गुळसुंदे मेनरोड ते मनवे ते काशिनाथ गाताडे HDPE पाईप लाईन टाकणे | रु. २६४०००/– मा. सभा २८/०४/२०२५ ठराव नं १६ (८) | २६४०/– | ५०० | ०३/०६/२०२५ | ३ महिने | १५ वित्त आयोग २५–२६ |
| ९ | लाडीवली अंगणवाडी शौचालय भांडे बसविणे टाइल्स ग्रील्स व तत्सम कामे करणे | रु. १३४१०२/– मा. सभा २८/०३/२०२५ ठराव नं १०१(११)१ | १३४१/– | ५०० | ०३/०६/२०२५ | १ महिने | ग्रामनिधी |
| १० | गुळसुंदे वैशाली फार्म हाउस ते पाटणकर पर्यंत DI पाईप लाईन टाकणे | रु. ४८८९९/– मा. सभा २८/०३/२०२५ ठराव नं १०१ (१३) | ४८८/– | २०० | ०३/०६/२०२५ | १ महिने | ग्रामनिधी |
| ११ | गुळसुंदे वार्ड क्र ३ गिरोबा सोसायटी गार्डन ते वसंत चव्हाण घरापर्यंत गटार पाईप लाईन करणे. | रु. २९९३६५/– मा.सभा २८/०४/२०२५ ठराव नं २०(१६)१ | २९९३/– | ५०० | ०३/०६/२०२५ | ३ महिने | १५ वित्त आयोग २४–२५ |

१. निविदा मिळणेकरिता दि. २६/०५/२०२५ ते २८/०५/२०२५ पर्यंत लेखी अर्ज/ नोंदनिकृत ठेकेदाराने सादर करणे २९/०५/२०२५ ते ०२/०६/२०२५ सुट्टीचे दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
२. (१) १% इसारा रक्कम (२) ठेकेदार नोदणी प्रमाणपत्र (३) GST पत्र व इतर सोबत जोडलेली सिलबंदनिविदा दि. ०३/०६/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारण्यात येतील.
३. दि. ०४/०६/२०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता समक्ष उघडणेत येतील.
४. म. ग्रा. पं लेखासहिता २०११ कलम ४५ (२) अन्वये विकास काम first call कमीतकमी ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Second Call ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Third Call २ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Fourth call १ नोंदणीकृत ठेकेदार, वैध असेल.
५. ईसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत गुळसुंदे यांचे नावे असावा (अथवा चेकने) चेक ठेकेदाराकडून आलेला असणे आवश्यक आहे.
६. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७. सदर कामाचे अदाज पत्रक कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.
८. निविदा पोस्टाने पाठवली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारली जाणार नाही.
९. निविदा फॉर्म किमत नापरतावा राहील.
१०. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% आयकर, २% GST १% लेबर इन्सुरन्स १% उपकर कपात केली जाईल.
११. २५०००० पर्यंत २ % GST ग्रा. पं. कट करील तर २५०००० वरील रक्कमेला एकूण १८% GST संबधीत नोंदणीकृत ठेकेदारांनी शासनास भरणा करणे बंधनकारक आहे.
१२. ज्या ठेकेदाराकडे GST नंबर नसेल त्यांच्या कडून जादा ५% GST कट करून घेण्यात येईल.
१३. वर्क ऑडर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न केल्यास दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीचे काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस संबधितास जबाबदार राहावे लागेल
१४. झालेल्या तात्रिक मूल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्ध ते नुसार देयके अदा केली जातील. (अदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त नाही तसेच कमी दराची रक्कम देय असेल)
१५. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसात काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१६. मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी JE यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायतदेखरेखीखाली करायचे आहे.
१७. निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/– चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारदेवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१८. सुरक्षा अनामत रक्कम अतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील. केलेल्या कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणी नुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१९. काम पूर्ण करणे पूर्वीचा कामाचे ठिकाणाचे फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अतिम बिले दिली जाणार नाही.
२०. सोबत दिलेल्या तात्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे
२१. निविदा धारकाकडे पॅन असणे गरजेचे आहे.
२२. निविदा ओपनिंगच्या दिवशी संबंधित नोंदणीकृत ठेकेदार हजर असणे आवश्यक आहे.
२३. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्विकृत राहील.
२४. बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे नावाचा बोर्ड बसविणे बंधनकारक आहे.
२५. ठेकेदारणे केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षणात त्रुटी आढळून आल्यास संबंधित ठेकेदाराला जबाबदार धरण्यात येईल.
२६. कमीत कमी दराची निविदा मंजूर करणे बाबत विचार करण्यात येईल / नोंदणीकृत ठेकेदाराला प्राधान्य राहील
२७. एक किवा सर्व निविदा ना मंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२८. आकस्मित एखादे काम रद्द करणेचा सार्वजनिक निर्णय झाल्यास भरलेली निविदा फी परत मिळणार नाही.
२९. एखाद्या कामाची निविदा लिफाफा ३ पेक्षा कमी आल्यास संबंधित ठेकेदारांनी ओपन करू नका असा आग्रह धरल्यास सदरचा लिफाफा ओपन न करण्याबाबत विचार केला जाईल.

**सही/–**
**रामदास दासगांवकर**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

**सही/–**
**मिनाक्षी भास्कर जगताप**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

# धोकादायक इमारती रिकाम्या करा

## पनवेल महापालिकेकडून नागरिकांना आवाहन

### जीवितहानी टाळण्यासाठी यादी जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक इमारतींचे प्रभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात प्रभाग समिती अ- १८, प्रभाग समिती ब-१५, प्रभाग समिती क- १०, प्रभाग समिती ड-३७ अतंर्गत एकूण ८० सी-१ या प्रवर्गात मोडणाऱ्या मिळकती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांच्या सदनिका रिक्त करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६५ व २६८ नुसार, तसेच राज्य शासनाच्या निर्देशांनुसार, सूचना देण्यात आल्या आहेत.



महापालिकेच्या अहवालानुसार, एकूण ८० धोकादायक इमारती असल्याचे निष्पन्न झाले आहे. या इमारतींमध्ये पावसाळ्यात मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे, अशा इमारतींतील नागरिकांनी तातडीने स्थलांतर करण्याबाबत महापालिकेच्यावतीने आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी सूचना दिल्या आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाने धोकादायक इमारतींवर कारवाई करण्याबाबत निर्गमित केलेल्या आदेशानुसार मुळ मालक, भोगवटादार यांना पुरेशी संधी देऊनही संबंधितांनी इमारत रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही केली नाही तर या इमारतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडीत करणे व त्यानुसार या इमारतींवर पोलीसांमार्फत निर्मनुष्य करून पाडण्याची कार्यवाही मनपामार्फत करण्यात येत आहे.

धोकादायक इमारत मालकांनी स्वतः हुन सुरक्षितरित्या पाडण्याची कार्यवाही करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवीत व वित्त हानी झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या संबंधित नागरीकांची तसेच इमारतीचे मालक व भाडेकरु यांची राहील. त्याचप्रमाणे अतिधोकादायक मालमत्तांचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्याची जबाबदारी संबंधित घरमालक किंवा भोगवटादार यांची राहणार आहे. याकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नागरिकांनी नोंद घ्यावी. धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची संपूर्ण माहिती www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच नागरिकांनी आपल्या आसपास धोकादायक इमारती असतील तर त्याची माहिती नजिकच्या प्रभाग अधिकाऱ्यांना द्यावी.

जीवितहानी टाळण्यासाठी नागरिकांनी अशा धोकादायक इमारतींमध्ये राहू नये व दिलेल्या सूचनांचे पालन करावे. अधिक माहितीसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या टोल फ्री (१८००-२३३-०००९) वर तसेच (०२२-७४५८०४०/४१/४२) या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन उपायुक्त रविकिरण घोडके यांनी केले आहे.

# पावसापासून बचावासाठी ताडपत्रीला मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



जून महिन्यात दाखल होणारा मान्सून यंदा मे महिन्यातच धडकला आहे. भले मान्सून जूनमध्ये धडकणार असला तरी यावर्षी मात्र मे महिन्यातच अवेळी पावसाची दमदार एन्ट्री सुरू झाल्याने बेसावध नवी मुंबईकरांची सध्या पावसापासून घराचे व गोडाऊन, दुकाना बाहेरील मालाचे पावसापासून बचाव व्हावा यासाठी आवश्यक असलेल्या ताडपत्रीला व प्लास्टिकच्या पेपरची मागणी वाढली आहे.

शहरातील बाजारपेठांसह तुर्भे येथील जनता मार्केट, कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील दुकानांमध्ये पाणकापड, ताडपत्री, प्लास्टिकचे पिवळे, निळे व काळे पेपर खरेदीसाठी ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. ताडपत्री व प्लस्टिकला जशी मागणी वाढली आहे. त्याच प्रमाणे त्यांचे दर ही वाढले आहेत. गरिबांपासून ते उच्चभ्रूसाठी पावसाळ्यात झोपडी ते टॉवरमधील इमारतीच्या बचावासाठी ताडपत्री महत्त्वाची भूमिका बजावते. सध्या बाजारात ताडपत्री व प्लस्टिकला अधिक मागणी वाढली आहे. बाजारात काळ्या ताडपत्रीला मागणी आधीक असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

पावसाच्या आगमनापूर्वी शहरातील श्रीमंता पासून ते गरिबांना पर्यत सर्व घटकातील नागरिक ताडपत्री व प्लास्टिकचे कापड खरेदी करून घराचे छत व उच्चब्रू वस्तीमधील गगनचुंबी इमारतीचे छत दुरुस्त करण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे प्लास्टिकची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामध्ये व्यापाऱ्यांकडूनही खरेदीदारांना हव्या त्या आकारामध्ये ताडपत्री व प्लास्टिक कागदाची मागणी पूर्ण केली केली जात आहे. शहरातील पूर्वे कडील औद्योगिक वसाहतींमधून लघु उद्योजकाकडून मोठ्या प्रमाणात ताडपत्री आणि प्लास्टिकच्या कापडाची खरेदी केली जाते. औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक गोडावून आहेत.

शहरातील तुर्भे जनता मार्केट, कांदा बटाटा मार्केट जवळील काही दुकानाबाहेर पावसाळी ताडपत्री व प्लस्टिक कागदाच्या खरेदी साठी गिऱ्हाईकांची गर्दी होत असल्याचे चित्र पहावयास मिळते. येथील झोपडपट्टी परिसरातून काळ्या प्लास्टिकला तर शहरातील सोसायटी, टॉवर आदीकडून निळ्या व चंदेरी रंगाच्या ताडपत्रीला मागणी अधिक आहे.

दोन प्रकारात उपलब्ध असलेल्या लॅमिनेशन रोल व लॅमिनेशन ताडपत्रीची किंमत ७०० रुपये प्रतिनग पासून ११०० रुपये प्रतिनग (१२ बाय १५) आहे. शहरातील नागरिकाकडून लॅमिनेशन रोल व लॅमिनेशन ताडपत्रीला मागणी अधिक असल्याचे विक्रेत्याकडून सांगितले जाते.

**काळ्या ताडपत्रीची सर्वाधिक खरेदी**

काळ्या ताडपत्रीला सर्वाधिक मागणी असून ती ७० आणि ९० रुपये मीटरने विकली जाते तर चांगल्या दर्जाच्या केबल ब्याल्क ही ताडपत्री सर्वधिक महाग असून बाजारात १२० रुपयांपासून ते १५० रुपये प्रति मीटरने विकली जाते. त्यानंतर निळी, पिवळी व हिरवी ताडपत्री ७० रुपये पासून १३० रुपये मीटरने विकली जाते. विशेषतः बांधकाम व्यवसायिक ताडपत्री आणि प्लास्टिक कागद पावसापासून आपल्या मालाचा बचाव व्हावा यासाठी खरेदी करीत असल्याचे अमितकुमार सिंग या विक्रेता यांनी सांगितले.

# असंसर्गिक आजार अंतर्गत रुग्ण तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या रुग्णालय व नागरी आरोग्य केंद्र स्तरावर दैनंदिन स्तरावर राष्ट्रीय असंसर्गिक रोग तपासणी कार्यक्रम अंतर्गत ३० वर्षावरील स्त्री व पुरुषांची तपासणी करण्यात येते व त्याची नोंदणी पोर्टल वर करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत उच्च रक्तदाब, मधुमेह, मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग याबाबत तपासणी व चाचण्या केल्या जात आहेत तसेच संशयित रुग्ण सार्वजनिक रुग्णालय, नेरूळ येथे संदर्भित करण्यात येत आहेत.

नवी मुंबई महापालिका अंतर्गत २१ ते २४ मे कालावधीत शासनामार्फत कॅन्सर व्हॅन नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात पाठविण्यात येणार असून व्हॅनमध्ये मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग याबाबत तपासणी व चाचण्या करण्यात येणार आहेत. मोहीमेचे नियोजन नवी मुंबई महापालिकेमार्फत करण्यात आलेले आहे.

कॅन्सर व्हॅन लोकशेनच्या नमूद ठिकाणी नियोजित कालावधीत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.




**नवी मुंबई :** दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, उपायुक्त किसनराव पलांडे, विजय रांजणे, अलका महापूरकर, स्वरूपा परळीकर, अरूण पाटील, अशोक अहिरे, संजीव पवार आदींनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली.

# वाशी गाव येथील प्रवाशी शेड स्थलांतरित करण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशीगाव बस स्थानकापासून दैनंदिन ये-जा करणाऱ्या प्रवासी नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी आजमितीला असलेली बस प्रवासी शेड तत्काळ स्थलांतरीत करावी, अशी मागणी माजी नगरसेविका फशीबाई भगत यांनी नवी मुंबई मनपा प्रशासन यांच्याकडे एका पत्रकाद्वारे केली आहे.




या मार्गांवरून दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशी नागरिकांनी आपल्या तक्रारी स्थानिक माजी नगरसेविका फशीबाई भगत यांच्याकडे लेखी स्वरूपात केल्या. त्यानुसार सायन-पनवेल महामार्गावरील दोन्ही बाजूने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था एनएमएमटी, बेस्ट आणि एसटी आदिच्या माध्यमातून प्रवाशांना सुलभ, जलद आणि अल्प किमतीत प्रवाशी सेवा नागरिकांना अविरत पणे देत आहे. आजमितीला प्रवास करणाऱ्या वाशीगाव व पलीकडील सेक्टर ४, ५, ६, ७ व ८ मधील नागरिकांच्या सोयीसाठी संबंधित परिवहन विभागामार्फत बस थांब्याच्या ठिकाणी शेडची व्यवस्था केली आहे, मात्र मुंबईहुन वाशीकडील बाजूने न्यू एरा हॉस्पिटल (व्होकार्ट हॉस्पिटल) च्या पुढे असलेली बस शेड हि पूर्वी असलेल्या बस थांब्याच्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेविका भगत यांनी केली आहे.

दैनंदिन प्रवासी व बसेस ज्या ठिकाणी थांबतात तेथे नविन प्रवासी शेड नसून ती पुढे काही अंतरावर आहे. परिणामी, प्रवासी महामार्गा शेजारील झाडांच्या सावलीचा आधार घेऊन उभे राहत असल्याचे निदर्शनास येथे. नुकतेच उन्हाच्या त्रासामुळे एका जेष्ठ प्रवासी नागरिकांस भोवळ येऊन अपघाताची घटना घडली होती.

येथे नागरिकांना होणारी असुविधा व त्रास लक्षात घेता सुरू असलेला तप्त उन्हाळा व आगामी पावसाळा लक्षात घेऊन येथील प्रवासी शेड असलेल्या ठिकाणापासून मागे उचित ठिकाणी शेड स्थलांतरीत करून प्रवास करणाऱ्या नागरिकांना सोयी उपलब्ध करून देण्यासाठी तत्काळ कार्यवाही करावी, अशी विनंती नवी मुंबई मनपा आयुक्त आणि परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापक यांना एका विनंती पत्राद्वारे केली फशीबाई भगत यांनी केली आहे.

# मलनिःसारण वहिनीची झाकणे झाली दुरूस्त!



**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ वॉर्ड क्रमांक ८४ मधील अनेक ठिकाणी मलनिःसारण वहिनीची झाकणे नादुरुस्त झाली होती. या ठिकाणी वाहने चालवताना तसेच चालताना नागरिकांचा अपघात होण्याची शक्यता होती.

याबाबत नागरिकांनी भाजपच्या सुहासिनी नायडू यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. नायडू यांनी तातडीने पालिकेकडे तक्रार केली. त्यांना अपघाता होण्याची शक्यता असल्याचे सांगत झाकणे दुरुस्त करण्याची मागणी केली. नायडू यांच्या तक्रारीनुसार पालिकेने तुटलेली झाकणे नव्याने बसवली. याबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# नवी मुंबईत रंगणार कॅट शो

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

प्राणी प्रेमींसाठी नवी मुंबई वाशी येथील सिडको प्रदर्शन सेंटर येथे २५ मे रोजी रविवारी एक 'कॅट शो' रंगणार असून विविध प्रजातीच्या हजारपेक्षा जास्त मांजर मांजरी पाहण्याची संधी मांजर प्रेमीना मिळणार असल्याची माहिती आयोजक फिलाइन क्लब ऑफ इंडियाचे अध्यक्ष साकिब पठाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जागतिक दर्जाच्या कॅट शोमध्ये पर्शियन, क्लासिक लाँग हेअर, एक्झॉटिक शॉर्ट हेअर, मेन कुन अशा विविध देशी-परदेशी जातीच्या मांजरी सहभागी होणार आहेत, जागतिक स्तरावरील तज्ज्ञ या वेळी परीक्षक म्हणून उपस्थित राहणार आहे. क्लबने भारतीय भटक्या मांजरांना 'इंडियामाऊ' अशी ओळख मिळवून देण्यात यश मिळवले आहे. या वेळी मांजरांना दत्तक घेता येणार असल्याचेही आयोजकांनी सांगितले.

# पनवेलमधील कुष्ठरोग वसाहतीत नेत्र तपासणी शिबिराला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल प्रेस क्लब आणि आर झुंजून वाला शंकर आय हॉस्पिटलतर्फे नुकतेच पनवेल येथील गणेश कुष्ठरोग वसाहतीमध्ये मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. वसाहतीतील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.




या वेळी पनवेल महापालिकेचे उपयुक्त वैभव विधाते, पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, सल्लागार गणेश कोळी, सल्लागार विजय पवार, शंकर आय हॉस्पिटलचे प्रमुख राजेश कापसे यांच्यासह वसाहतीतील रहिवासी उपस्थित होते.

या तपासणीनंतर शंकर आय हॉस्पिटलमध्ये पूर्ण मोफत उपचार केले जाईल असेही कापसे यांनी सांगितले तर आतापर्यंत महाराष्ट्रात जवळपास ३०००० शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्याचाही नमूद करण्यात आले. तर कुष्ठरोग्यांची यापूर्वीची काय व्यथा होती आणि महापालिकेच्या प्रयत्नामुळे त्यांना समाजात एक जीवनमान वाल्याचा अनुभव स्थानिक नागरिकांनी सांगितला त्याचबरोबर पनवेल महापालिकेचे उपाध्यक्ष वैभव विधाते यांनी महापालिका ही तुमच्या हक्काची आहे आणि त्यामुळे तुमच्या सोबत सदैव उभी आहे, असे आश्वासन देत नागरिकांना प्रोत्साहन दिले.

पनवेल प्रेस क्लब सातत्याने अशी उपक्रम राबवते आणि त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे गौरवद्गार उपयुक्त वैभव विधाते यांनी काढले. पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांच्या प्रयत्नामुळे दुर्लक्षित असणाऱ्या या वस्तीमध्ये नेत्र तपासणी शिबिर राबवल्यामुळे स्थानिक आणि आभार मानले. त्याचबरोबर प्रशांत शेडगे यांनी प्रेस क्लबच्या वतीने सातत्याने गोरगरिबांसाठी उपक्रम राबवणार असल्याचेही सांगितले.

क्लिक...क्लिक...!



रत्नागिरी : जयगड परिसरातील समुद्रकिनारा आणि त्याच्यासमोरील हिरव्यागार डोंगराचे आकाश पवार यांनी टिपलेले छायाचित्र.

# कोपरखैरणेत रंगधनु नवरंग साहित्य संमेलन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबईच्या वतीने रविवार, ८ जून २०२५ रोजी कोपरखैरणे येथील ज्ञानविकास शिक्षण संकुल सभागृहात साजरे होणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक एल.बी.पाटील यांची निवड झाली असून स्वागत अध्यक्ष पी.सी. पाटील ज्येष्ठ सामाजिक नेते हे भूषविणार आहेत.

या संमेलनात पहिल्या सत्रात गज आनन म्हात्रे लिखित नवी मुंबईच्या प्राचीन ग्रामदेवता या संशोधनपर पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. तसेच नवीमुंबईतील सहा गुणवंतांना नवरंग कलारत्न पुरस्कार २०२५ सन्मानपूर्वक देण्यात येणार आहेत. संमेलनात दुपारच्या दुसऱ्या सत्रात आजचे पुस्तक-दिशा आणि दशा या विषयावर परिसंवाद होणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक देविदास पोटे हे भूषविणार आहेत. शेवटच्या सत्रात प्रसिद्ध साहित्यिका प्रतिभा सराफ यांच्या उध्यक्षतेखाली खुले कवीसंमेलन होणार आहे. नवरंगचे अध्यक्ष गज आनन म्हात्रे यांनी ही माहिती दिली आहे. अधिक माहितीसाठी म्हात्रे (९३२३१७२६१४) वर संपर्क साधावा.

अरविंद पाटील, म.वा.म्हात्रे, प्रा.वृषाली मगदुम, साहित्यिका कुमुदिनी गोडबोले आदींचाही सहभाग असणार आहे.

**नवरंग कलारत्न पुरस्कार २०२५ जाहिर**

मोरेश्वर पवार- नामांकित शिल्पकार
जगदिश कर्जेकर - प्रसिद्ध चित्रकार
शशीकांत पारगावकर- संगीत अलंकार
विलास समेळ - अक्षर रचनाकार
राजाराम पाटील- फर्डे वक्ते
श्रीहरी पवळे मास्तर - प्रसिद्ध रांगोळीकार

# मालमत्ता कर बिले आता ऑनलाईन

**नवी मुंबई :** महापालिकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ची मालमत्ताकर बिले आता ऑनलाईन उपलब्ध करून दिली आहेत. नागरिकांना आपले कराचे बील घरबसल्या, कुठेही आणि केव्हाही पाहता व भरता यावे यादृष्टीने महापालिकेच्या www.nmmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तसेच "MY NMMC - माझी नवी मुंबई' या पवर मालमत्ताकर बिले उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. नागरिकांनी आपले मालमत्ताकर बिल ३० जून २०२५ पर्यंत भरल्यास बिलातील सामान्य करावर १० टक्के सवलतीचा लाभ मिळवता येणार आहे. ही मालमत्ता धारक नागरिकांसाठी सुवर्णसंधी आहे.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंमलबजावणीत बदल

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत आता दुहेरी फायदा आणि मोठ्या संधी मिळणार आहेत. या योजनेच्या तरतुदीमध्ये बदल करण्यात आला असून शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आह.

प्रकल्पाची कमाल मर्यादा वाढली असून आता उत्पादन क्षेत्रातील प्रकल्पांसाठी एक कोटी रुपये आणि सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळवण्याची संधी मिळणार आहे.

खेळत्या भांडवलाची चिंता मिटली असून सेवा उद्योगांसाठी आता प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के आणि उत्पादन उद्योगांसाठी ४० टक्क्यांपर्यंत खेळत्या भांडवलासाठी निधी उपलब्ध होणार आहे. कुक्कुटपालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल/ढाबा (शाकाहारी/मांसाहारी), होम-स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा, मासेमारी, प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय आता योजनेंतर्गत पात्र असतील.

शैक्षणिक पात्रतेत शिथिलता आणण्यात आली आहे. १० लाखांवरील उत्पादन प्रकल्पांसाठी आणि पाच लाखांवरील सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी आता फक्त आठवी पास असणे आवश्यक आहे. कमी शिक्षण असूनही आता उद्योजक बनण्याची संधी असून वयोमर्यादेचे बंधन नाही. आता १८ वर्ष पूर्ण झालेल्या कोणत्याही स्थानिक रहिवाशाला या योजनेचा लाभ घेता येईल.

### प्रकल्पाच्या किमतीत लक्षणीय वाढ

*सेवा उद्योगांसाठी कमाल प्रकल्प मर्यादा रु.२० लाखांवरून ५० लाख रुपये झाली आहे. उत्पादन उद्योगांसाठी कमाल प्रकल्प मर्यादा रु.५० लाखांवरून १०० लाख रुपये (१ कोटी रुपये) झाली आहे. यामुळे बँकांना मोठ्या रकमेची कर्ज प्रकरणे मंजूर करण्याची संधी मिळेल, जे त्यांच्या वार्षिक कर्ज वितरण उद्दिष्टांसाठी (Annual Loan Disbursement Targets) अत्यंत उपयुक्त ठरेल. मोठ्या प्रकल्पांना वित्तपुरवठा केल्याने एकूण वितरणात वाढ होईल.*

### मार्जिन मनीच्या समायोजन प्रक्रियेत स्पष्टता

*मार्जिन मनी रकमेचे संबंधित कर्ज खात्यामध्ये समायोजन कर्जाच्या पहिल्या हप्त्याच्या वितरणास तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर जिल्हास्तरीय कार्यबल समितीच्या मान्यतेने करण्यात येईल. यामुळे बँकांना मार्जिन मनी हाताळणी आणि समायोजन याबाबत स्पष्टता मिळते, ज्यामुळे प्रक्रिया अधिक सुलभ होते आणि योग्य व्यवस्थापनास मदत होते.*

### खेळत्या भांडवलाच्या मर्यादित वाढ

*सेवा उद्योगांसाठी खेळत्या भांडवलाची मर्यादा प्रकल्प खर्चाच्या ६० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे. उत्पादन उद्योगांसाठी खेळत्या भांडवलाची मर्यादा प्रकल्प खर्चाच्या ४० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे प्रकल्पांना पुरेसे खेळते भांडवल मिळेल, ज्यामुळे त्यांच्या यशस्वी होण्याची शक्यता वाढते आणि थकबाकी (NPA) कमी होण्यास मदत होते. बँका अधिक सुरक्षितपणे कर्ज देऊ शकतील.*

### नवीन पात्र उद्योगांचा समावेश

*कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, हॉटेल/ढाबा, होम-स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा, मासेमारी, प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय यांसारख्या अनेक नवीन कृषीपूरक आणि सेवा उद्योगांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे कर्ज देण्याचे क्षेत्र विस्तारले आहे, ज्यामुळे बँकांना विविध प्रकारच्या उद्योजकांना कर्ज देण्याची आणि त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये विविधता आणण्याची संधी मिळेल.*

### वय आणि शैक्षणिक पात्रतेतील लवचिकता

*किमान वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण करण्यात आली आहे आणि कमाल वयोमर्यादेची अट काढून टाकण्यात आली आहे. शैक्षणिक पात्रता १० लाखांवरील उत्पादन प्रकल्पांसाठी आणि ५ लाखांवरील सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी किमान आठवी उत्तीर्ण अशी सुधारित केली आहे. यामुळे पात्र अर्जदारांची संख्या वाढेल, परिणामी बँकांकडे अधिक कर्ज अर्ज येतील आणि त्यांच्या मंजुरीचे प्रमाण वाढेल.*

### प्रशिक्षणात सूट

*ज्या लाभार्थ्यांकडे उद्योजकता प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र आहे, त्यांना अनिवार्य निवासी/ऑनलाईन प्रशिक्षणातून सूट देण्यात आली आहे. यामुळे कर्ज मंजुरी प्रक्रिया अधिक जलद होईल, कारण प्रशिक्षणाची वाट पाहण्याची गरज नाही. यामुळे वेळेत कर्ज वितरण करण्यास मदत होईल.*

जिल्हास्तरीय आढावा व समन्वय समिती (DLRCC) आणि जिल्हास्तरीय छाननी व समन्वय उप समिती (DLSCC) रद्द करून केवळ जिल्हास्तरीय कार्यबल समिती (DLTFC) कार्यरत राहील.

DLTFC मध्ये प्रमुख बँक प्रतिनिधींचा समावेश केला जाईल. यामुळे बँका आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यातील समन्वय सुधारेल, ज्यामुळे कर्ज प्रकरणांची छाननी आणि मंजुरी प्रक्रिया अधिक वेगवान व कार्यक्षम होईल.

DLTFC वेळोवेळी आढावा घेऊन संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देईल आणि जिल्हास्तरीय बँकर्स समितीची बैठक आयोजित करून योजनेच्या प्रगतीचा आढावा घेईल. हे बँकांना त्यांच्या उद्दिष्टांसाठी आवश्यक पाठिंबा आणि मार्गदर्शन प्रदान करेल.

# मुरूड महावितरणकडून वीजचोरीचा पर्दाफाश

**मुरूड : प्रतिनिधी**

कल्याण भरारी पथकातील एजन्सी यांनी व मुरूड महावितरण कंपनी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुरूड बाजारपेठ येथील दिलीप सुखराज जैन यांच्या मालकीच्या असलेल्या फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स महावीर दुकानातील व घरातील वीज मीटरची तपासणी केली. यामध्ये त्यांनी घरासाठी व व्यापारासाठी लावण्यात आलेल्या वीज मीटरमध्ये फेरफार करून वीज चोरी करीत असल्याचे आढळून आले. त्यामुळे महावितरण कंपनी मुरूड विभागाच्या प्रभारी सहाय्यक अभियंता सतीश खरात यांनी कार्यकारी अभियंता प्रदीप डालू व उपकार्यकारी अभियंता मुरूड कृष्णात सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस ठाण्यात वीजचोरीचा विद्युत कायदा २००३ अन्वेय १३५ व १३८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, दिनांक १६ मे २०२५ रोजी कल्याण भरारी पथकांतील एजन्सीमधील कर्मचारी व मुरूड महावितरण कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त मोहिमेद्वारे मुरूड बाजारपेठ येथील दुकानातील व घरगुती मीटरची तपासणी करण्यात आली. दिलीप जैन यांच्या मालकीच्या असलेल्या महावीर फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स दुकानामध्ये तपासादरम्यान असे आढळून आले की, वरती राहत असलेल्या दुमजली घरामध्ये अनधिकृत वीज वापर करीत आहे. प्रत्यक्ष वीज मीटर तपासणी करीत असताना घरातील व दुकानातील वीज मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करीत असल्याचे आढळून आले आहे. त्याप्रमाणे सदरील वीजचोरीच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास मुरूड पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

दुकानातील वीजचोरी दंड सुमारे एक लाख ९५ हजार व घरातील वीज चोरी दंड सुमारे सहा लाख रुपये दंड आकारण्यात आला आहे.

याबाबतची माहिती मुरूड महावितरण कार्यालयाचे उप कार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले की, मुरूड शहर व ग्रामीण भागातील जनतेने वीज चोरी करू नये. दिलीप जैन यांच्या दोन्ही मीटरमध्ये फेरफार करून वीज चोरी केल्याचे आढळून आले आहे. त्याप्रमाणे प्रत्यक्ष वीज वापरानुसार विद्युत कायदा २००३ कलम १३५ व १३८ नुसार दंड देण्यात आला आहे. महावितरणचे कार्यक्षेत्र माणगाव असल्याने तिथे गुन्हा दाखल होत असतो, परंतु तपासासाठी तो मुरूड पोलीस ठाण्यात वर्ग होणार असल्याची माहिती यावेळी सूर्यवंशी यांनी दिली.

# रेवदंडा येथे श्री गणेश याग



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील कान्होजी आंग्रेनगरमधील साईबाबा मंदिरात गुरुवारी (दि.२२) स्वामी समर्थ साप्ताहिक सेवा केंद्र (दिंडोरी प्रणित) श्री गणेश याग सोहळा मोठ्या भक्तीमय वातावरणात झाला.

अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रचार प्रसार अंतर्गत ग्राम अभियान मांदियाळी सोहळा रेवदंडा येथे प्रथम वर्धापनदिनाचे औचित्याने झाला. या सोहळयास रेवदंडा व परिसरातील भाविक मोठया संख्येने उपस्थित राहून सेवेचा लाभ घेतला.

या निमित्त साईबाबा मंदिर येथे सकाळी ५ वाजता मंडळ पुजा, सकाळी ८ वाजता भुपाली आरती, सकाळी ९ वाजता सामुदायिक याग, सकाळी १०.३० वाजता नैवेध्य आरती, सकाळी ११ वाजता श्री गणेश याग, दुपारी २ वाजता जोगवा, दुपारी ३ वाजता महाप्रसाद, दुपारी ३.३० वाजता हळदी कुंकू, संध्याकाळी ४ वाजता अनुभव कथन, संध्याकाळी ५ वाजता औदुंबर प्रदक्षिणा, संध्याकाळी ६.३० वाजता नैवेध्य आरती आदी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते.

# भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ पालीत रॅली

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील पालीत भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ गुरुवारी (दि.२२) तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

भारत माता की जय, जय जवान जय किसान च्या घोषणा देत सहभागींनी भारतीय सैन्य दलाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ही रॅली बल्लाळेश्वर मंदिर, पाली बाजारपेठ, गांधी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक या मार्गे काढण्यात आली. या वेळी सुधागड तालुक्यातील अनेक गावातील आजी माजी स्वातंत्र सैनिकांचा सत्कार करण्यात आला. या वेळी पाली पोलिसांनी संपूर्ण सुरक्षा पुरवत वाहतुकीचे योग्य ते नियोजन केले.



# भर पावसात कर्जत शहरात तिरंगा यात्रा; देशप्रेमींचा जल्लोष

**कर्जत : प्रतिनिधी**



भारताने पाकिस्तानवर हल्ला केल्यानंतर पाकने अक्षरश: शरणागती पत्करली. त्याचा जल्लोष म्हणून राज्यभरात भारतवासियांकडून ठिकठिकाणी तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी धुवाधार पावसाने सुरुवात केली, मात्र देशप्रेमी नागरिकांनी उत्साहात या यात्रेमध्ये सहभाग घेतला होता. या वेळी नागरिकांनी भारत माते की जय, पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देत या वेळी परिसर दणाणून सोडला.

कर्जत शहरातील श्रीराम पुला नजिकच्या प्रतिआळंदी येथून तिरंगा यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. मुख्य बाजारपेठ, पोलीस ठाणे मार्गे ही यात्रा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्ध पुतळ्याला जवळ आल्यावर आमदार महेंद्र थोरवे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून ही यात्रा पुढे टिळक चौकातून कर्जत रेल्वे परिसरातून श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहचली. शेकडोंच्या उपस्थितीत निघालेल्या या यात्रेत अबालवृद्ध सहभागी झाले होते.

या वेळी निवृत्त सैनिक विनायक उपाध्ये व दगडू धुळे यांना रथातून या यात्रेत सहभागी करण्यात आले. या वेळी मुसळधार पाऊस सुरू झाला, परंतु यात्रेत सहभागी झालेल्या नागरिकांचा उत्साह वाढतच गेला. या वेळी निवृत्त सैनिकांचा सत्कार करण्यात आला. आमदार महेंद्र थोरवे यांनी पहेलगाम हल्ल्याच्या घटनेवरून दहशतवाद्याने जात विचारून केलेला भ्याड हल्ल्याचा निषेध केला. या पार्श्वभूमीवर भारतीय जवानांनी सुरू केलेले मिशन सिंदूर आणि पाकिस्तान शहरात घुसून भारतीय सैन्य दलाने केलेली कारवाई मध्ये पाकिस्तानी लष्कराचे महत्वाचे स्थळ उडवून लावत पाकिस्तानला सळो की पळो करून सोडल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले. दीपक बेहेरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

या वेळी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, माजी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, किरण ठाकरे, सुनील गोगटे, रमेश मुंढे, राजेश भगत, संकेत भासे, विजय जिनगरे, युसूफ खान, शर्वरी कांबळे, डॉ. गीता काळे, उमा डोंगरे, अ‍ॅड. गायत्री परांजपे, स्नेहा गोगटे, राधा बहूतुले, सुरेखा शितोळे आदींसह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऑपरेशन सिंदूरच्या सन्मानार्थ रोहा शहरात तिरंगा रॅली

**रोहे : प्रतिनिधी**

देशाच्या सैनिकांनी पाकिस्तानच्या विरोधात ऑपरेशन सिंदूर यशस्वीरित्या राबवल्यानंतर देशभरात सैनिकांचे कौतुक होत आहे. या अतुलनीय शौर्याचा कौतुक करण्यासाठी व ऑपरेशन सिंदुरच्या यशानंतर भारतीय सेनेच्या स्मरणार्थ रोहा शहरातून बुधवारी (दि.२१) सायंकाळी तिरंगा रॅली काढण्यात आले.



रोहा शहरातील कुंडलिका नदी संवर्धन येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णकृत पुतळ्याला अभिवादन करून तिरंगा रॅली काढण्यात आली. तिरंगा रॅली नवरत्न हॉटेल, दमखाडी, मिरज हॉटेल, रोहा नगर परिषद चौक, एसटी स्टँड, तीन बत्ती नाका, बाजारपेठ, राममारूती चौक, वीर सावरकर रोड, ते नगर परिषद चौक या मार्गावर काढण्यात आली. रोहा नगर परिषद चौकात माजी सैनिकांचे रोहेकरांच्या वतीने सन्मान करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रोशन चाफेकर यांनी केले.

या वेळी माजी सैनिकासह शिवसेना शिंदे गट तालुका प्रमुख मनोजकुमार शिंदे, राष्ट्रवादी तालुका कार्याध्यक्ष समिर शेडगे, भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग, दक्षिण रायगड भाजपचे उपाध्यक्ष राजेश मापारा यांनी मनोगत व्यक्त केले.

या रॅलीत माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, ह.भ.प शेळके महाराज, महेंद्र गुजर, अहमद दर्जी, मयुर दिवेकर, जयेश छेडा, यज्ञेशं भांड, मंगेश रावकर, जयवंत मुंढे, राम नाकती, अशोक निकम, अशोक तेंडुलकर, सनीलकुमार, राजेश डाके, निलेश शिर्के, कृष्णा बामणे, श्रध्दा घाग, स्वरांजली शिर्के, अनिता शेडगे, प्रसाद खुळे, वैभव कुलकर्णी, बिलाल मोर्बेकर, विभा चोरगे, ज्योती तेंडूलकर, स्वप्नील धनावडे, विनीत वाकडे आदी सहभागी झाले होते.

# रायगडच्या उमेश चौधरींचे संगीत महोत्सवांमध्ये शास्त्रीय गायन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्याचे सुपुत्र आणि प्रख्यात शास्त्रीय गायक पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांनी आपल्या सुरेल, सर्जनशील आणि शास्त्रशुद्ध गायकीच्या माध्यमातून देशभरातील श्रोत्यांच्या हृदयात अढळ स्थान निर्माण केले आहे. गेल्या चार दिवसांत त्यांनी सलग चार राज्यस्तरीय शास्त्रीय संगीत महोत्सवांमध्ये सहभाग घेत महाराष्ट्राबाहेर कर्नाटक, बेळगाव, हैद्राबाद आणि बंगलोर येथे आपल्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले.







रायगड जिल्हा संस्कृतीनिष्ठ भूमीतील कलाकार पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांनी आपल्या सर्जनशील गायनाने संपूर्ण देशभरात शास्त्रीय संगीतातील अध्वर्यू म्हणून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांचे गायन हे केवळ कलात्मक सादरीकरणापुरते मर्यादित न राहता, शास्त्रीय संगीतातील मूलतत्त्वांचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्यही ते प्रभावीपणे करत आहेत. त्याच अनुषंगाने त्यांनी वाटचाल करताना चार दिवसात महाराष्ट्र राज्याबाहेर विविध ठिकाणी सलग चार शास्त्रीय गायनाच्या महोत्सवात गायन करत परराज्यातीलही रसिकांची मने जिंकली. कर्नाटक, बेळगाव, हैद्राबाद, बँगलोर येथे झालेल्या शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमात त्यांनी आपल्या ओजस्वी आणि भावपूर्ण गायनातून विविध रागांतील तंत्र, बंदिशी, आणि विशिष्ट घराण्याची गायकी सादर करत त्यांनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

त्यांच्या सादरीकरणास संगीतप्रेमी, विद्वान आणि अभ्यासकांकडून विशेष दाद मिळाली. पं. उमेश चौधरी हे गेल्या ३० वर्षांपासून संगीत क्षेत्रात सक्रिय असून, त्यांनी देशातील अनेक प्रतिष्ठित मंचांवर शास्त्रीय संगीताचे सादरीकरण केले आहे. कर्नाटक मधील मुडलगी येथे शिवरुद्र स्वामी मठ, बेळगाव येथील बी. आर. कडाळस्कर ट्रस्ट तर्फे केकणवाडी आयुर्वेदिक कॉलेज ऑडिटोरियम, हैद्राबाद येथे मॅस्ट्रो म्युझिक अकॅडमीवतीने, आणि बंगलोर येथे धून म्युझिक अकॅडमीच्या वतीने गायन महोत्सव आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र ते कर्नाटक, बेळगाव, हैद्राबाद, बंगलोर असा दूरवरचा प्रवास करत त्यांनी चार दिवसात चार महोत्सवात आपले शास्त्रशुद्ध शास्त्रीय गायन सादर केले.

यानिमिताने शिवरुद्र स्वामी मठाचे श्रीधर स्वामी यांनी त्यांना आशीर्वाद दिले तसेच पुढील वर्षीही कार्यक्रमाला येण्याचे आमंत्रित केले. त्याचबरोबरीने संगीत क्षेत्रातील दिग्गज असलेले गुरुराज कुलकर्णी, प्रसाद पंडित, वंदना कट्टी, संजय देशपांडे, श्रीधर कुलकर्णी यांसारख्या अनेक मान्यवरांनी पं. उमेश चौधरी यांच्या गायनशैलीचे कौतुक केले.

या वेळी झालेल्या गायनासाठी पं. उमेश चौधरी यांना तबल्याबर पं. विनायक नाईक, विजय रेड्डी, पं. निषाद पवार, सूरज गोंधळी यांनी हार्मोनियमवर पं. सुधांशु कुलकर्णी, मंदार दीक्षित, योगेश रामदास, सुर्या उपाध्याय, यादवेंद्र पुजारी यांची संगीत साथ लाभली.

# पत्रकार धम्मशील सावंत यांना पुरस्कार प्रदान

**पाली : प्रतिनिधी**





ठाणे येथे न्यूज वन इंडिया या नॅशनल चॅनलच्या कार्यालयाच्या उद्घाटनावेळी महाराष्ट्राच्या मुख्य रिपोर्टर फरीयल शेख (सय्यद) यांनी महाराष्ट्रातील नामवंत पत्रकारांचा सत्कार करून विशेष गौरव केला. या कार्यक्रमात रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधी धम्मशील सावंत यांना सर्वश्रेष्ठ पत्रकार पुरस्कार २०२५ने सन्मानित करण्यात आले.

पत्रकार धम्मशील सावंत यांनी आपल्या बातमीतून नेहमीच जनतेचे प्रश्न व समस्यांना वाचा फोडून न्याय देण्याचे काम केले आहे. तळागाळात पोहचून सर्वसामान्य जनतेच्या हिताची पत्रकारिता करण्यात ते अव्वल ठरले आहेत.

शोषित पीडित अन्यायग्रस्त व वंचीत घटकाला अपेक्षित न्याय व त्यांच्या उत्कर्षासाठी असलेले योगदान देण्यात पत्रकार सावंत यांची भूमिका नेहमीच महत्वाची ठरली आहे. हा पुरस्कार महाराष्ट्र चीफ फरीयल सय्यद यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी सर्व पुरस्कार प्राप्त पत्रकारांना या वेळी उपस्थित विविध क्षेत्रातील दिग्गज व प्रतिभावंत मान्यवरांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुंबईची प्लेऑफमध्ये धडक

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५मध्ये प्लेऑफचे चार संघ ठरले आहेत. तीन संघ आधीच पात्र ठरले होते. यानंतर बुधवारी मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांमध्ये प्लेऑफसाठी नॉकआऊट सामना खेळला गेला. यामध्ये मुंबईने वानखेडेच्या घरच्या मैदानावर दिल्लीचा पराभव केला.

वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सचा पराभव केला आणि यासह त्यांनी आयपीएल प्लेऑफमध्ये प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांत १८० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्स संघ १८.२ षटकांत फक्त १२१ धावा करू शकला.

मुंबईच्या विजयाचे हिरो सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह आणि मिचेल सँटनर ठरले. ज्या खेळपट्टीवर मोठे फटके खेळणे कठीण होते, त्या खेळपट्टीवर शेवटी सूर्यकुमार यादवने चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. सूर्यकुमारने ४३ चेंडूत नाबाद ७३ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने सात चौकार आणि चार षटकार मारले. त्याला साथ देत नमन



धीरने आठ चेंडूत २४ धावा केल्या. यानंतर गोलंदाजीत, सँटनरने चार षटकांत ११ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. बुमराहनेही १२ धावा देऊन तीन गडी बाद केले.

मुंबई इंडियन्सचा संघ या विजयासाठी आयपीएलच्या प्लेऑफसाठी क्वालिफाय ठरला. मुंबईशिवाय रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्स हे संघ पात्र झाले होते. अजून लीग टप्प्यातील सामने बाकी आहेत. हे सामने संपल्यानंतर प्लेऑफच्या सामन्यांना सुरुवात होईल.

प्लेऑफमध्ये पहिला सामना क्वालिफायर १ आणि दुसरा सामना एलिमिनेटर मध्ये होईल. गुणतालिकेत पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावरील संघ पहिला क्वालिफायर सामना खेळतील, तर एलिमिनिटेरमध्ये दुसरा आणि तिसरा संघ खेळेल. हे दोन्ही सामने न्यू चंदीगडमध्ये होतील, तर क्वालिफायर २ सामना क्वालिफायर १चा पराभूत संघ आणि एलिमिनेटरचा विजयी संघ यांच्यात होईल, तर क्वालिफायर १चा विजेता आणि क्वालिफायर २चा विजेता संघ अंतिम फेरीत प्रवेश करतील. हे दोन्ही सामने अहमदाबादमध्ये होतील.

यंदाच्या प्लेऑफमध्ये दोन संघ असे आहेत, ज्यांनी आजवर कधीच आयपीएलचे जेतेपद पटकावलेले नाही. आरसीबी आणि पंजाब संघाला जेतेपद जिंकण्याची यंदा संधी आहे, तर गुजरातचा संघ दुसरे जेतेपद जिंकण्याचा प्रयत्न करेल. याशिवाय मुंबई इंडियन्सची नजर ऐतिहासिक सहाव्या जेतेपदावर असेल.

**प्लेऑफचे वेळापत्रक**

२९ मे : क्वालिफायर १ – गुणतालिकेत पहिल्या आणि दुसऱ्या स्थानी असलेल्या संघांमध्ये, मुल्लानपूर, न्यू चंदीगढ

३० मे : एलिमिनेटर – गुणतालिकेत तिसऱ्या आणि चौथ्या स्थानी असलेल्या संघांमध्ये, मुल्लानपूर, न्यू चंदीगढ

१ जून : क्वालिफायर २ – क्वालिफायर १चा पराभूत संघ वि. एलिमिनेटरचा विजेता, अहमदाबाद

३ जून : अंतिम सामना – दोन्ही क्वालिफायरचे विजेते संघ, अहमदाबाद.

# इंग्लंड दौऱ्यासाठी भारताच्या अंडर-१९ संघाची घोषणा

## आयुष म्हात्रे, वैभव सूर्यवंशीला संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलनंतर भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. भारताचा सिनियर संघ, भारत अ संघ आणि भारताचा अंडर-१९ संघ अशा तिन्ही तुकड्या जूनमध्ये इंग्लंडविरूद्ध खेळताना दिसणार आहे. बीसीसीआयने आधीच भारताचा अ संघ जाहीर केला होता. यानंतर आता अंडर-१९ संघाचीही घोषणा केली आहे.

भारताच्या ज्युनियर क्रिकेट समितीने २४ जून ते २३ जुलैदरम्यान होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यासाठी भारताच्या १९ वर्षांखालील संघाची निवड केली आहे. या दौऱ्यात ५० षटकांचा सराव सामना, त्यानंतर पाच सामन्यांची युथ एकदिवसीय मालिका आणि इंग्लंड १९ वर्षांखालील संघाविरुद्ध दोन बहुदिवसीय सामने होतील.

बीसीसीआयने या अंडर-१९ संघाचे नेतृत्त्व करण्याची जबाबदारी युवा फलंदाज आयुष



म्हात्रेवर दिली आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये आयुष म्हात्रेने चेन्नई सुपर किंग्स संघाकडून खेळताना आपल्या खेळीची छाप पाडली आहे, तर १४ वर्षीय फलंदाजी वैभव सूर्यवंशीचीदेखील संघात निवड करण्यात आली आहे. वैभव आणि आयुष याआधीही भारताच्या अंडर-१९ संघात एकत्र खेळले आहेत.

आयुषने आतापर्यंत सहा आयपीएल सामन्यांमध्ये सलामीवीर म्हणून खेळताना १८७च्या स्ट्राईक रेटने २०६ धावा केल्या आहेत. त्याची सर्वोत्कृष्ट खेळी ९४ धावांची होती.

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने तर यंदाच्या आय़पीएलमध्ये वादळी खेळी करत सर्वांचे लक्ष वेधले. संजू सॅमसनला दुखापत झाल्यानंतर वैभवला पदार्पणाची संधी मिळाली आहे. त्याने ३५ चेंडूत शतक झळकावत सर्वांनाच चकित केले. वैभवने सात सामन्यांमध्ये २०६च्या स्ट्राईक रेटने २५२ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये १०१ धावा ही त्याची सर्वोच्च धावसंख्या आहे.

**असा आहे संघ**

आयुष म्हात्रे (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा, मौल्यराजसिंह चावडा, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (उपकर्णधार आणि यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आर एस अंबरीश, कनिष्क चौहान, खिलन पटेल, हेनिल मोहम्मद पटेल, युवराज पटेल, युवराज पटेल, युवराज, प्रदीपन आदित्य राणा, अनमोलजीत सिंग; राखीव खेळाडू नमन पुष्पक, डी दिपेश, वेदांत त्रिपाठी, विकल्प तिवारी, अलंकृत रापोळे (यष्टीरक्षक).

# कुलदीप यादवने टाकले हरभजन सिंगला मागे

## आयपीएलमध्ये १०० विकेट्सचा टप्पा पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

चायनामन कुलदीप यादव याने मुंबई इंडियन्सविरुद्धच्या लढतीत खास विक्रमाला गवसणी घातली आहे. मुंबईतील वानखेडेच्या मैदानात दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना त्याने रायन रिकल्टनची विकेट घेत आयपीएलमध्ये शंभर विकेट्सचा टप्पा पार केला. कुलदीपने ९७ सामन्यात हा डाव साधला आहे. भज्जीचा विक्रम मोडीत काढत तो जलदगतीने हा पल्ला गाठणारा चौथा भारतीय फिरकीपटू ठरलाय.

आयपीएलमध्ये सर्वात जलदगतीने १०० विकेट्स घेणाऱ्या फिरकीपटूंच्या यादीत अमित मिश्रा अव्वलस्थानी आहे. त्याने अवघ्या ८३ सामन्यात हा टप्पा पार केला होता. त्याच्यापाठोपाठ या



यादीत वरुण चक्रवर्तीचा नंबर लागतो. त्यानेही ८३ सामन्यातच शंभरावी विकेट्स आपल्या खात्यात जमा केली होती. कुलदीपने १०० सामन्यात १०० विकेट्स घेणाऱ्या भज्जीला मागे टाकले आहे.

# आरसीबीच्या संघात टीम सेफर्टला स्थान

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएल प्लेऑफच्या सामन्यांना सुरूवात होण्यापूर्वी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघात विस्फोटक फलंदाजाची एन्ट्री झाली आहे. संघातील फलंदाज जेकब बेथेल स्पर्धेतून बाहेर पडला. त्याच्या जागी टीम सेफर्टचा संघात समावेश करण्यात आला आहे.

टीम सेफर्ट हा न्यूझीलंड संघातील विस्फोटक फलंदाज आहे. आरसीबीने त्याला दोन कोटी मोजून आपल्या संघात स्थान दिले आहे. सेफर्टला आतापर्यंत ६६ टी-२० सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. यादरम्यान त्याने १५४० धावा केल्या आहेत. सेफर्ट सध्या पाकिस्तान सुपर लीग स्पर्धा खेळत आहे. त्याचा संघ स्पर्धेत टिकून राहतो की नाही यावर तो भारत आयपीएल खेळण्यासाठी येणार की नाही हे ठरेल.

# सूर्यकुमार यादवने केली विश्वविक्रमाशी बरोबरी

## टी-२०च्या सलग १३ डावांमध्ये २५पेक्षा जास्त धावा

**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्ली कॅपिटल्सविरूद्ध खेळल्या गेलेल्या प्लेऑफसाठीच्या सामन्यात सूर्यकुमार यादवने उत्कृष्ट फलंदाजी करत संघाला १८० धावांचा टप्पा गाठण्यात मोलाची भूमिका बजावली. या खेळीसह सूर्यादादाने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

सूर्यकुमार यादवने यंदाच्या मोसमात भले ही शतकी खेळी केलेली नाही, पण अर्धशतकी आणि छोट्या खेळींच्या जोरावर त्याने आपला फॉर्म दाखवत विश्वविक्रमी कामगिरी केली आहे. त्याने यंदाच्या मोसमात त्याच्या सर्व



खेळींमध्ये २५ अधिक धावा केल्या आहेत. आतापर्यंत टी-२० क्रिकेटच्या इतिहासात टेम्बा बावुमा (दक्षिण आफ्रिका) हा एकमेव फलंदाज आहे, ज्याने सलग १३ डावांमध्ये २५पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. त्याने २०१९ ते २०२० दरम्यान, हा पराक्रम केला होता. आता एकाच वर्षात २०२५मध्ये सलग १३ वेळा २५ अधिक धावा करण्याचा विक्रम सूर्यकुमार यादवने करीत त्याची बरोबरी केली आहे.

अशी कामगिरी करणारा तो जगातील दुसरा आणि भारतातील पहिला फलंदाज ठरला आहे. ब्रॅड हॉज, जॅक रुडॉल्फ, कुमार संगकारा, ख्रिस लिन आणि काइल मेयर्स यांनी आतापर्यंत ११ वेळा ही कामगिरी करून दाखवली आहे.

# वैभव सूर्यवंशीसोबतच्या ‘त्या’ फोटोंवर प्रीती झिंटा भडकली!

**दिल्ली : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीसोबतचे मॉर्फ केलेले फोटो पाहून बॉलीवूड अभिनेत्री आणि पंजाब किंग्जची सह-मालक प्रीती झिंटा संतापली. राजस्थानविरुद्ध पंजाब किंग्ज सामन्यानंतर एका वृत्तवाहिनीने वैभव आणि प्रीती एकमेकांना मिठी मारतानाच्या छायाचित्रांवर बातमी दिली, त्यावरून प्रीतीने संताप व्यक्त केला आहे.

प्रीती झिंटाने ट्वीट केले आहे की, ‘हा एक मॉर्फ केलेला फोटो आणि खोटी बातमी आहे. मला खूप आश्चर्य वाटते की,



आता वृत्तवाहिन्यादेखील मॉर्फ केलेले फोटो वापरत आहेत आणि त्या बातम्या म्हणून दाखवत आहेत.

एका न्यूज वेबसाइटने बातमीला शिर्षक दिले आहे की, ‘थोडी घाबरलेली, थोडी लाजलेली आणि मग... प्रीती झिंटाने वैभव सूर्यवंशीला मिठी मारली तेव्हा काय झाले?’ खरंतर, प्रीती आणि वैभवचा व्हिडीओ त्यांच्या अनेक फॅन पेजवर व्हायरल झाला आहे. व्हिडीओमध्ये प्रीती त्याच्याशी फक्त हस्तांदोलन करताना दिसत आहे, तर या बातमीतील छायाचित्रांमध्ये प्रीती वैभवला मिठी मारताना दिसत आहे. या गोष्टीवर प्रीती रागावली. प्रीतीच्या कमेंट सेक्शनमध्ये अनेक सोशल मीडिया वापरकर्ते राग व्यक्त करीत आहेत. ते प्रीतीला तिने गुन्हा दाखल करावा, असा सल्लाही देत आहे.

दरम्यान, आता त्या घटनेनंतर दोन दिवसांतच प्रीती झिंटाने न्यायालयात धाव घेतल्याचे वृत्त आहे.

# कसोटीत विराटच्या जागी करूण नायर पर्याय

## माजी खेळाडू संजय बांगर यांचे मत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रोहित शर्मापाठोपाठ विराट कोहलीनेही कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. जूनमध्ये इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी संघ निवडीबाबत आता चर्चा सुरू आहे. चौथ्या क्रमांकावर विराटच्या जागी कोण खेळणार यावर मोठा खल सुरु आहे. या जागी शुभमन गिल आणि केएल राहुल यांना संभाव्य उमेदवार म्हणून घोषित केले जात असताना माजी क्रिकेटपटू संजय बांगर यांनी या यादीत आणखी एका नावाची समावेश केला आहे.

‘ईएसपीएनक्रिकइन्फो’वर बोलताना संजय बांगर म्हणाले की, भारतीय कसोटी संघात चौथ्या क्रमांकावर करूण नायर हा मला अधिक योग्य वाटतो, कारण त्याने देशांतर्गत स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी केली आहे. कसोटीमध्ये स्थान परत



मिळवण्यासाठी त्याने भरपूर परिश्रम घेतले आहेत.

करूण नायरने यंदाच्या देशांतर्गत हंगामात जबरदस्त पुनरागमन केले आहे. करूणच्या नेतृत्वाखालील विदर्भ संघाने विजय हजारे ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला व रणजी ट्रॉफीही जिंकली. या दोन्ही स्पर्धेत करूणने उत्तम कामगिरी केली आहे. नायर सध्या ३३ वर्षांचा आहे. कसोटी क्रिकेटमध्ये त्रिशतक झळकावणारा तो वीरेंद्र सेहवागनंतरचा दुसरा भारतीय फलंदाज आहे.

**‘अभिमन्यू ईश्वरनही संघात स्थान मिळवेल’**

इंडिया अ सामन्यांमध्ये खराब कामगिरी केल्यानंतर बॉर्डर-गावसकर ट्रॉफीसाठी भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळवण्यात ईश्वरन अपयशी ठरला. इंग्लंड लायन्सविरुद्धच्या सराव सामन्यांसाठी इंडिया अ संघाचा कर्णधार म्हणून त्याची निवड करण्यात आली असल्याने त्याला आणखी एक संधी मिळू शकते. नायरबरोबरच बांगरने पश्चिम बंगालच्या अभिमन्यू ईश्वरन यालाही संधी देण्यात यावी, असे म्हटले आहे. अभिमन्यूने खूप धावा केल्या आहेत. मला विश्वास आहे की, तो कसोटी संघात स्थान मिळवेल, असे बांगर म्हणाले.

# मुंबईने प्लेऑफमध्ये प्रवेश करताच वानखेडेवर सेलिब्रेशन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सने बुधवारी दिल्ली कॅपिटल्सला हरवून आयपीएल प्लेऑफमध्ये दिमाखात एन्ट्री घेतली. या वेळी सामना पहायला आलेला मराठमोळा अभिनेता सिद्धार्थ जाधवने वानखेडेवर जोरदार सेलिब्रेशन केले. याशिवाय ट्रेंडींग गाण्यावर खान्स डान्सही केला.

अभिनेता सिद्धार्थ जाधव मुंबई इंडियन्सचे सामने पहायला वानखेडेवर हजेरी लावताना दिसतो. सिद्धार्थ मुंबई वि. दिल्लीची मॅच बघायलाही वानखेडेवर उपस्थित होता. त्या वेळी सिद्धार्थने मराठी इन्लफ्लुएन्सरसोबत ‘नटीनं मारली मिठी’ या ट्रेंडींग गाण्यावर डान्स केला. सिद्धार्थची तुफान एनर्जी या वेळी बघायला मिळाली.

## सिद्धार्थ जाधवने दाखवला जलवा



मुंबई प्लेऑफमध्ये गेल्याने सिद्धार्थ आनंदी झालेला दिसला. संघाच्या ऑफिशिअल पेजने हा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर पोस्ट केलाय. अल्पावधीतच सिद्धूचा हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

वानखेडेच्या घरच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध दिमाखदार विजय नोंदवत प्लेऑफ्समधील आपले स्थान पक्के केले आहे. दुसरीकडे या सामन्यातील पराभवासह दिल्ली कॅपिटल्सचा यंदाच्या हंगामातील प्रवास संपुष्टात आला आहे. सुरुवातीला हा सामना अटीतटीचा वाटत होता, परंतु मुंबई इंडियन्सचे गोलंदाज रिकल्टन आणि बुमराहने दिल्लीच्या सर्व फलंदाजांना ऑल आऊट करत संघाला प्लेऑफमध्ये दिमाखात प्रवेश करून दिला.

# जिल्हास्तरीय खो-खो पंच परीक्षा रविवारी कामोठे येथे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा खो-खो असोसिशनतर्फे जिल्हास्तरीय पंच परीक्षा घेण्यात येणार आहे. कामोठे सेक्टर ११ येथील सुषमा पाटील विद्यालय व ज्युनियर कॉलेज येथे रविवारी (दि. २५) ही परीक्षा होणार आहे.

सकाळी १० ते दुपारी १२ या कालावधीत १०० गुणांची लेखी परीक्षा होईल. त्यानंतर ५० गुणांची मौखिक आणि ५० गुणांची प्रात्यक्षिक अशी एकूण २०० गुणांची ही परीक्षा असेल.

रायगड जिल्ह्यातील रहिवासी असलेली १८ वर्षांवरील व्यक्ती या परीक्षेसाठी पात्र असेल. रायगडचा रहिवासी नसलेला, परंतु नोकरीस किंवा शिक्षणासाठी रायगडात स्थायिक असलेली व्यक्तीदेखील परीक्षेसाठी पात्र



असेल. इच्छुकांनी विहित नमुन्यातील अर्ज संपूर्ण माहिती भरून १००० रुपये परीक्षा शुल्कासह २५ मेपर्यंत रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनकडे जमा करणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी लावण्य मगर (९९८७०७७३१७) किंवा अमोल जाधव (९७७३४२२२१४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनचे कार्यवाह आशिष पाटील यांनी केले आहे.

# खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्र पदकतक्त्यात अव्वल स्थानावर

**दीव : वृत्तसंस्था**

महिलांच्या चमकदार कामगिरीच्या जोरावर पहिल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राने चार सुवर्णांसह पदकतक्यात अव्वल स्थानावर झेप घेतली आहे.

सागरी जलतरणात सलग दुसऱ्या दिवशी पदकाचा डबल धमाका पहाण्यास मिळाला. पेंचक सिलट प्रकारातही जयश्री शेटेने सोनेरी कामगिरी करीत दिवस गाजविला. महाराष्ट्राने बीच कबड्डी-सॉकरमध्येही उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

खेलो इंडिया युवा स्पर्धेपाठोपाठ बीच स्पर्धेतही महाराष्ट्राचा जयजयकार पहिल्या दिवसापासून घुमत आहे. दीवच्या घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत चार सुवर्ण, चार रौप्य आणि सहा कांस्यांसह एकूण १४ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने प्रथम स्थानावर मुसंडी मारली आहे. चार सुवर्ण नऊ पदकांसह मणिपूर दुसऱ्या, तर चार सुवर्णांसह एकूण सात पदकांची कमाई करीत दीव-दमण तिसऱ्या स्थानावर आहे.

## जलतरणात दुहेरी धमाका

दीवच्या अरबी समुद्रात पुन्हा एकदा महराष्ट्राच्या मुलींनी वर्चस्व गाजवले. पाच किमी स्विमथॉन प्रकारात सलग दुसऱ्या दिवशी साताऱ्याच्या दिक्षा यादवने सुवर्णपदकाला गवसणी घातली. याच प्रकारात रौप्य पदकही महाराष्ट्राच्या पूर्वा गावडेने जिंकून राज्यासाठी दुहेरी यश संपादले. रंगलेल्या पाच किमी शर्यतीत दिक्षा व पूर्वाने सुरुवातीपासून आघाडी घेतली होती. कर्नाटकच्या आसरा सुधिरने कडवी झुंज दिली. अंतिम रेषेपर्यंत दिक्षा, पूर्वा व आसरामध्ये कमालीची चुरस दिसून आली. अखेर एक तास १०.१२ वेळ नोंदवून दिक्षाने बाजी मारली. केवळ १३ शतांश सेकंद मागे राहिलेल्या पूर्वाने १.१०.२९ वेळेत रूपेरी यश पटकावले. १.१०.२९ वेळ देत आसराला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com